"The question of rural labourers and Employment Guarantee Scheme" by Com. Chandragupta Chaudhary

# ग्रामीण श्रमिकांचे प्रश्न

आ णि

# रोजगार हमी योजना

कॉं. चंद्रगुप्त चौधरी

[ किंमत रु. १–५० पैसे ]

महाराष्ट्र राज्य ट्रेड युनियन कॉंग्रेस प्रकाशन

प्रगती प्रिंटींग प्रेस, पैठण गेट-औरंगाबाद.

कलेक्टरला द्या. 'सी' क्लास नगरपालिकेच्या जागी अंबर चरखा, वीट भट्टी ई. दुसरी उत्पादक कामे काढा, मजुरांच्या वेतनात वाढ द्या. हत्यार अवजाराचे भाडे वाढवून दुप्पट करा, रो ह. यो. वरच्या मजुरांना दिवाळीचा बोनस द्या, प्रत्येक मजुराला किती दिवस काम मिळते याची नोंद ठेवा अशा अनेक सूचना समितीने केल्या. शासन म्हणून अधिकार गाजविणाऱ्या सचिवालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या सर्वांना केराची टोपली दाखविली ! सत्तेच्या धुंदीत राहणाऱ्या, सहानुभूती शून्य अशा या शासनाशी महाराष्ट्राच्या आजच्या अभूतपूर्व दुष्काळाच्या कार्यात सापडलेल्या लक्षावधी लोकांना जगण्यासाठी संघर्ष करावयचा आहे. हा संघर्ष दीर्घकाल चालणारा आहे. हा संघर्ष एकजूटीनेंच व संघटनेच्या बळावरच लढविला जाणार आहे व या संघर्षामुळे ह्या एकजुटीचे व संघटनेचे बळ वाढणार आहे.

नुकत्याच झालेल्या नागपुरच्या विधीमंडळाच्या बैठकीत दुष्काळग्रस्त जनतेच दुःखाचे व आक्रोशाचे पहिले हुंकार कानी पडले आहे. त्याने शासनाच्या आत्मसंतुष्ट वृत्तीला एक धक्का जरुर दिला आहे व कांही आश्वासने देण्यास भाग पाडलें आहे. पंधरा दिवसात सर्व जिल्ह्यात रोजगार हमी समित्या नेमल्या जातील, कोणती कामे काढावित यासंबंधीचे निर्बंध सैल केले जातील ई. कांही आश्वासने मिळाली आहेत. परन्तु शेवटी ही आश्वासनेंच आहे. प्रत्यक्ष ग्रामीण पातळीवर शासकीय यंत्रणा सुस्तच आहे. कामाची ओरड सार्वत्रिक आहे. दुष्काळग्रस्त जनतेची पाणी चाऱ्याची ओरड आहे ज्यांचा धीर संपला ते गुरेढोर विकून स्थलांतर करताहेत. अजून तर ही सुरुवात आहे उन्हाळा तर अजून पुढे आहे. जशी धरती तप्त होत जाणार आहे तशी तशी परिस्थिती तप्त होत जाणार आहे. त्या असंतोषावर आरुढ होऊन त्याला संघटित करणे व महाराष्ट्राच्या विशाल जनतेची प्रचंड शक्ती या दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी उपयोगात घेणे, आज जगणे व उद्याची जगण्याची हमी निर्माण करणे हे महान व ऐतिहासिक कार्य महाराष्ट्राच्या ग्रामीण श्रमजीवी वर्गाला येत्या कांही महीन्यात करायचे आहे. त्यात त्याला यश मिळेल हे सुनिश्चित आहे. अट एकच आहे-

## निर्धार युक्त एकजूट, संघटना व संघर्ष !

# रोजगार हमी कायदा–एक महत्वाचे पाऊल !

रोजगार हमीचा कायदा करुन महाराष्ट्र शासनानें देशामध्ये एक पुढाकाराचे पाऊल उचलले आहे. या कायद्याने ग्रामीण कष्टकरी जनतेचा कामाचा हक्क स्विकारला आहे. याचा उपयोग करुन जास्तीत जास्त गरजू लोकांना पुरेसे काम वेतन मिळविण्यासाठी कांही संघटना गेली कित्येक वर्षे पद्धतशीर व संघटित प्रयत्न करताहेत. हे प्रयत्न म्हणजे एक समृद्ध अनुभव आहे. या अनुभवानें कायद्याचा आधार घेऊन काय मिळवता येते हे जसे स्पष्ट केले आहे तसेच त्याने या कायद्याच्याच मर्यादा नव्हेतर आजच्या शासन यंत्रणेच्या, शासनाच्या व एकंदर ग्रामीण अर्थव्यवस्थेने निर्माण केलेल्या मर्यादाही समोर आणल्या आहेत. हा कायदा आल्यामुळे खेड्यातील दारिद्र नष्ट होईल हे जसे खरे नाही तसेच हा कायदा आल्यामुळे खेड्यातील बेरोजगारीचेही पूर्ण उच्चाटन झालें किंवा होईल हेही खरे नाही. ग्रामीण भागातील बरोजगारी हा असा महारोग आहे ज्याचा सतत विस्तार होत आहे. व त्याला आवर घालण्याची कुवत या कायद्यात नाही. ह्या अफाट बेकारीचा उगम आजच्या एकंदर शेती व्यवस्थेत व अर्थव्यवस्थेत आहे व ती व्यवस्था बदलल्याशिवाय व सर्व आर्थिक जीवनात आमूलाग्र परिवर्तन आणण्याशिवाय या बेकारीचे उच्चाटन होऊ शकत नाही. ज्यांना असे क्रांतीकारी बदल नको आहेत ते शासनाच्या अशा प्रत्येक तात्पुरता आधार व सवलती देणाऱ्या योजनेची समाजवादाच्या दिशेनें वाटचाल ह्या शब्दात भलामण करतात. परंतु त्यांचा हा दावा पोकळ आहे, तो एक भ्रम आहे. आज अस्तित्वात असलेली व्यवस्था, मालकी हक्क, आर्थिक चौकट व पिळवणूकीचे प्रकार कायम ठेऊन समाजवाद कसा काय येऊ शकतो ? तेव्हा सत्य हे सांगीतलेच पाहिजे. त्याचबरोबर रोजगार हमीच्या या कायद्याने ग्रामीण श्रमजीवी वर्गाला त्यांचा अनंत अडचणीच्या जीवनात ज्या थोड्या बहुत सवलती मीळु शकतात त्या मिळवून देण्यासाठी मन लावून चिकाटीने प्रयत्न हे सुद्धा केलेच पाहिजेत. याचा दुसराही महत्वाचा लाभ आहे. रोजगार हमीच्या कामाच्या निमित्ताने खेड्यातील कष्टकरी समाज शेकडोंच्या संख्येने या ना त्या कामावर प्रथमच एकत्र येऊ लागला आहे. त्यांच्यामध्ये श्रमीक म्हणून एक नवी जागृती निर्माण होऊ लागली आहे. खेड्यातील कुजट जातीभेदांना तो खेड्यातच टाकून देऊन कामावर पोटासाठी एकजुट करु लागला आहे, संघटीत होऊ लागला आहे. ही एक अप्रतिम संधी आहे. नव्या विचारांची पेरणी करण्याची, नव्या पायावर, वर्गीय पायावर एकजूट बांधण्याची ! ग्रामीण

कष्टकऱ्यांची ही एकजूट एक प्रचंड शक्ती बनू शकते. कारण रोजगार हमीच्या कामावर गर्दी करणारा जसा खेड्यातील मजूर आहे तसाच लहान शेतकरीही आहे, दोघांनाही काम हवे असते. ते नसेल तर दोघांचीही उपासमार होते. अवर्षण असेल तर यांच्या पंक्तीत ज्याला मध्यम स्थितीचा शेतकरी म्हणता येईल तोही येऊन बसतो. कोणत्याही भागाचा विचार केला तर ही जनता हमखास ७५ ते ८० टक्के आहे. तीने मनात आणले तर ती शासनाला नमवू शकते, काम मिळवू शकते, भ्रष्टाचारी व उर्मट अधिकाऱ्यांना वठणीवर आणू शकते. एवढेच नव्हे तर ही जनता शासन बदलू शकते. व्यवस्था बदलू शकते. रोजगार हमी योजनेवर कामाचे व दामाचे लढे व हक्काला जोडून जमीनीचे लढे हे परिवर्तनाच्या लढाईची, त्याच्यासाठी बांधावयाच्या भक्कम एकजुटीची, निर्धाराची, एकजुटीची व संघर्षाची रंगीत तालीम बनू शकते. परंतु त्यासाठी स्पष्ट ध्येय दृष्टी पाहिजे. काय बदल केलेत तर दारिद्र, बेकारी, विषमता, गुलामी याला मूठमाती देता येईल याचे स्पष्ट आकलन पाहिजे व मग रोजचे पोटापाण्याचे लढे लढतांना ह्या अंतिम लढ्यासाठी सज्ज होण्याचे भान व आव्हाहन पाहिजे. आजच्या व उद्याच्या लढ्याची अशी सांगड ही परिवर्तनाच्या लढ्याच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

ग्रामीण कष्टकऱ्यांची आजची स्थिती अत्यंत कठीण आहे. ते मजूर असोत कि लहान शेतकरी त्यांच्या जीवनाला काही शाश्वतीच राहीलेली नाही. दुःखावर डागण्या देणारे शासनाचे धोरणही त्यांच्या बद्दल कमालीच्या उपेक्षेचे आहे. बेकारीचा प्रश्न घ्या ! औद्योगीक क्षेत्रात या प्रश्नाचे स्वरुप काय, व्याप्ती काय याची इत्थंभूत आकडेवारी सहजपणे उपलब्ध आहे. बंद कारखाने किती, आजारी किती, त्यामुळे बेकार झालेले किती, या शिवाय एम्प्लायमेंट सेवानियोजन कार्यालयात किती जणानी नांवे नोंदविली आहेत, किती लोकांना कॉल जातात या सर्व गोष्टीची माहिती मिळू शकते. पण शेती क्षेत्रात किती बेकार याची नोंद सापडणे कठीण ! खेड्यातील मजुरांपैकी, भूमिहीनांपैकी किती लोकांना शेती उद्योगात समावून घेण्याची क्षमता शेती धंद्यात आहे ? किती लोकांना वर्षभर काम मिळू शकते ? किती लोकांना काही काळच ? बाकीच्या वेळात त्यांना कोणते काम उपलब्ध नाहे ? खरीपाचा हंगाम संपल्यानंतर किती जण नियमीतपणे बाहेर गावी कामासाठी निघून जातात ? त्यांच्या या कामाची शाश्वती किती ? या व अशा जिव्हाळ्याच्या प्रश्नाबाबत शासनाजवळ कोणतीच अधिकृत माहिती नाही. आहेत फक्त काही राष्ट्रीय पातळीवरचे सँपल. सर्वे, नमुना पाहणी अहवाल व काही अभ्यासकांचे अगदी मर्यादित पाहणीचे निष्कर्ष.

आणि खरे पाहिले तर ग्रामीण जीवनाचे प्रमुख विदारक वास्तव हेच आहे. कोणत्याही खेड्यात जा आज तेथे कायम बेकारांची एक खडी फौज तयार झालेली आहे. त्यात जसे अंग मेहनत करणारे लोक आहेत तसेच शिकलेले तरुणही आहेत.

आजच्या अर्थ व्यवस्थेला न त्यांच्या श्रमाची गरज आहे न त्यांच्या ज्ञानाची डीग्रचांची. ज्यांच्या पिढ्यान् पीढ्या गावात गेल्या, जे लहानपणापासून गावात वाढले त्यांना गावाच्या समाज जीवनात स्थान उरलेलें नाही. त्यांना ना शेती आहे ना धंदा ना नौकरी आहे ना कायमचा रोजगार ! अशा या तरुण पिढीचें सारे जीवनच अधांतरित झालें आहे. गावाचा गाडा त्यांच्या शिवाय बिनधोक चाललेला ते पहातात. असे हे गाववाले ! पण प्रत्यक्षात गावाबाहेर फेकले गेलेले ! मग पोटाची खळगी भरण्यासाठी गावाबाहेर पडतात. प्रथम हंगामी काम पाहाण्यासाठी परंतु ज्यांना तेही लाभत नाही ते मग नाईलाजाने शहराच्या वाटा धरतात ! कामाच्या आशेनें ! ती एक लॉटरीच असते कारण तेथे पूर्वीपासूनच बेकाराचीं फौज तयार असते. त्यात हेही मिसळतात आणि कामाच्या नावाने मिळेल तो उद्योग करतात. कुठे चिंध्या जमा कर, कुठे हमाली-वर जग, कुठे हॉटेलात कपबश्या विसळ, कुठे दारु, मटक्याच्या धंद्यात पड ! रहायला घर नाही. झोपडपट्टीचा आसरा धर व तोही आसरा मिळाला नाही तर रेल्वेच्या फलाटावर, पुलाखाली, फुटपाथवर आसरा शोध ! असे हें घाण वस्तीत व घाण धंद्यात आयुष्य घालव ! खेड्यात ज्याला स्थान राहीले नाही त्याची दैना अवस्था आहे ! स्वतंत्र भारताचे हे नागरिक आहेत. किती आहेत हे लोक ? रोजगार हमी योजनेच्या तहत ज्यांनी आपली नावे काम मागण्यासाठी नोंदविली त्यांची संख्या ३१-१२-७९ रोजी ३७.५ लक्ष होती. तर १-१०-८१ रोजी वाढून ती संख्या ४४.१ लक्ष झाली होती. ६५ लक्ष ग्रामीण मजुरांपैकी ४८ लक्ष मजूरांना व लहान शेतकऱ्यांना शेती क्षेत्राबाहेर रोजगाराची गरज आहे हे यातून स्पष्ट होते आणि असा रोजगार मिळाला नाही तर ते शेवटी शहराचा रस्ता धरतात. १९७१ ते १९८१ या दहा वर्षाच्या काळात साऱ्या देशातून आपआपल्या खेड्यांना कायम रामराम ठोकून पाच कोटी लोक शहराकडे गेले कामधंदा पाहाण्यासाठी ! एकट्या मुंबई शहरात झोपडपट्टीत राहणाऱ्यांची संख्या आज पन्नास लक्ष आहे. ही सर्व कालची व आजची खेड्यातून बाहेर फेकली गेलेली जनता आहे. कोरडवाहू शेती, अवर्षणाचे वारंवार बसणारे तडाखे, यामुळे जेथे बहुसंख्य शेतकऱ्यांना स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अशक्य प्रायः होते तेथे ती शेती किती मजुरांचा भार वाहु शकेल ? ग्रामीण बेरोजगारीचा प्रश्न शेती व्यवस्थेच्या या व इतर प्रश्नांशी निगडीत झालेला प्रश्न आहे. रोजगार हमी कायद्याने आपल्या उद्दिष्टात ग्रामीण भागातील वरकड मनुष्य शक्तीला रोजगार पुरविण्याच्या गरजेचा स्पष्ट उल्लेख करुन हे सत्य स्विकारले आहे. प्रासंगिक पद्धतीने काम पुरवून या बेकारीची दाहकता त्याचा त्रास, थोडा कमी करता येतो. परंतु बेकारीच्या प्रश्नाची मुलभूत सोडवणूक करावयाची असल्यास शेती व्यवस्थेतच नव्हे तर एकंदर नियोजनात मूलभूत बदल करावे लागतील हे ही तितकेच सत्य आहे.

खेड्यातील सामान्य लोकांचें जीवनाचे आज जे चित्र दिसते ते लांडग्यांच्या तडाख्यात सापडलेल्या प्राण्याच्या चित्रासारखे आहे. पूर्वी लांडग्याच्या स्वरुपात इंग्रज

होते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भांडवलशाहीने व जमीनदारांनी ह्या लांडग्यांचा अवतार घेतला आहे.

इंग्रजाचे राज्य आले त्यापूर्वी खेडे गावाची एक विशिष्ट रचना होती व त्यात सर्वांना नेमून दिलेले स्थान होते. शेती व गृहउद्योग याची सांगड होती. शेती शिवायच्या गरजेच्या वस्तु कापड इत्यादी गावातच तयार होत. तो निर्माण करणारा, पिंजारा, विणकर, इत्यादी सारखा एक कुशल वर्ग गावात होता. या शिवाय बलुतेदार, सुतार, लोहार, चांभार, इत्यादी होते. जवळ जवळ स्वयंपुर्ण अशा या ग्रामीण अर्थ–व्यवस्थेत फार कमी बेकार लोक होते. १९४२ साली सर थॉमस मनरो नावाच्या शिरगिणती अधिकाऱ्याने सेन्सस कमिशनरने आपल्या अहवालात शेरा मारला की भारतात कोणीही भूमिहीन नाही. त्याच्या ह्या म्हणण्याचा अर्थ एवढाच की त्यांची संख्या नोंद घेण्याइतकी नव्हती. परंतु त्यानंतरच्या काळात हे चित्र झपाट्याने बदलू लागले.

१८८२ साली ७५ लक्ष, १९२१ साली २१० लक्ष १९३१ साली ३३० लक्ष अशी भूमिहीनाची फौज झपाट्याने वाढू लागली, त्याला मुख्य दोन कारणे झाली. पहिले कारण इंग्रजानी त्यांच्या देशातील कारखान्यात तयार होणारा माल कापड या देशात मोठ्या प्रमाणात आणला व येथील खेड्यातील गृहउद्योग स्पर्धा करुन व राज्य सत्तेचे बळ वापरुन उध्वस्त केलें व येथील हस्त उद्योग व्यवसायात काम कर–णाऱ्या लक्षावधी लोकांना बेकारीच्या खाईत ढकलून दिलें. इंग्रजांनी दुसरा हल्ला शेतकरी वर्गावर केला त्यांनी शेतसाऱ्यात बेसुमार वाढ केली, ती वस्तू रुपाने न घेता पैशात घेण्याची सुरुवात केली इकडे शेतीमालाचे भाव पडले, सारा न भरणाऱ्यांच्या जमिनीचे लिलाव सुरु केले व अनेक राज्यात सारा वसुल करणारा एक मध्यस्थ जमीनदार वर्ग निर्माण करुन त्याला शेतकऱ्याला वाटेल तसे पिळण्याची मुभा दिली. याच्या परिणामी शेतकरी देशोधडीला लागलें. त्यांची शेती सावकाराच्या ताब्यात गेली व दुष्काळाने थैमान घातलें इ. स. १८५० ते इ. स. १९०० च्या पन्नास वर्षांच्या काळात २ कोटी लोक दुष्काळात मृत्युमुखी पडले. इंग्रजाचे राज्य संपत असतांना १९४३–४४ या दोन वर्षात एकट्या बंगाल प्रांतात दुष्काळाने ४० लक्ष लोकांचा बळी घेतला. ब्रिटीशांच्या निष्ठूर पिळवणुकीच्या धोरणाने ग्रामीण अर्थ–व्यवस्थेला अशातऱ्हेने सर्वनाशाच्या कडेवर नेले. ह्या सत्तेचा अंत करण्यासाठी १९४२ ची चलेजाव चळवळ क्रांतीसिंह नाना पाटलांनी बंडाचा झेंडा उभारुन उभे केलेले साताऱ्याचे प्रति सरकार व देशभरात झालेले शेतकऱ्यांचे उठाव अशी प्रखर आंदोलन झाली. ह्या सर्वांच्या मागे दोन मुख्य प्रेरणा होत्या. एक इंग्रजाच्या गुलाम–गिरीपासून मुक्तता व दुसरे सर्वप्रकारच्या शोषणाचा अंत !

स्वातंत्र्य आले शेतीव्यवस्थेत काही महत्वाचे बदल झाले, जागीरदार गेले. सरजामी जमीनदार गेले. कुळांना संरक्षण देणारा कायदा झाला व नंतर खाजगी जमीनमालकीवर कमाल मर्यादा ठेवणारा सिलिंगचा कायदा झाला. यासर्व बदलातून मिळालेली जमीन पुर्वीच्या कुळांना व इतर भूमिहीनांना वाटण्यात आली. त्याचबरोबर काही सरकारी फॉरेस्टची व गायरान जमीन वाटण्यात आली. इतके सर्व करुन स्वातंत्र्याच्या ३९ वर्षानंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचे चित्र कसे आहे ? जमिनीची विषम वाटणी संपली की कायम आहे ? भूमिहीनांचीं संख्या वाढली की कमी झाली ?

१९८१ च्या शिरगिणतीच्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्रात ज्यांच्याजवळ थोडी बहुत का असेना जमीन आहे. अशा शेतकऱ्यांची संख्या ८४ लक्ष आहे तर जे केवळ खेड्यात मजूरीवर जगतात अशा भूमिहीनांची संख्या ६५ लक्ष आहे जमीन वाटपाचा एवढा डोंगर पोखरुन ही लक्षावधी भूहीनांची भूक सरकार भागवू शकलेले नाही. हे या आकडेवारीतून स्पष्ट होणारे पहिले दारुण सत्य आहे.

दुसरे सत्य असे की सिलींग कायदे करून वर्षे लोटली तरी खेड्यातील जमीनीची विषम वाटणी, काहीच्या जवळ भरपूर जमीनी अनेकांच्या जवळ केवळ लाहान लाहान तुकडे ही परिस्थिती बदलली नाही. उदाहरणार्थ १९७१ च्या आकडेवारी प्रमाणें पांच एकरापेक्षा सुद्धा कमी जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४२.८ आहे. पण एकूण जमिनीत त्यांचा हिस्सा फक्त ८.७ टक्के एवढाच आहे. या उलट २५ एकरापेक्षा अधिक जमिनीचे मालक असे शेतकरी फक्त १०.३८ टक्के आहेत. परंतु एकुण जमिनीत त्यांचा वाटा ३९.९८ टक्के एवढा मोठा आहे. तराजुच्या एका पारड्यात हे बाहा शेतकरी बसविले दुसऱ्या पारड्यात वरील ४३ गरीब शेतकरी बसविले तर ह्या दहा शेतकऱ्यांचे जमीन जुमल्याचे व त्यांच्यापेक्षा पाच पट जास्त भरेल ! जमीन धारणेतील ही विषमता आजच्या भांडवलशाही युगात इतर अनेक क्षेत्रात विषमतेला जन्म देते. ज्यांच्याकडे मुबलक शेती आहे, पाणी आहे, व पैसा आहे तेच आजच्या सुधारित शेतीच्या तंत्रज्ञानाचा वापर उपयोग करू शकतात. त्यांच्याचकडे अधिक भांडवल जमा होत जाते व हळूहळू ते अर्थव्यवस्थेच्या व राजकारणाच्या सर्व नाड्यावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करतात. स्वातंत्र्यानंतरच्या काळात आर्थिक व राजकीय सत्तेचे ग्रामीण भागात झालेले केन्द्रीकरण हे आजच्या परिस्थितीचे तीसरे महत्वाचे सत्य आहे.

जे गरीब आहेत, ज्यांच्याकडे शेती नाही किंवा अत्यंत कमी, हलकी किंवा कोरडवाहू शेती आहे त्यांना हे वर्चस्व झुगारून स्वाभिमानाने जगण हे दिवसनुदिवस अधिक कठीण होत चालले आहे. खेड्यात ज्यांना जगण्याचे साधनच शिल्लक नाही व शहरात गेले तर ?

देशात सर्वात मोठी कारखानदारी महाराष्ट्रात आहे परंतु ही कारखानदारी किती लोकांना जगवू शकते ? १९७६ च्या आकडेवारी प्रमाणे महाराष्ट्रातील लहान मोठ्या सर्व उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची एकूण संख्या १० लक्ष ४८००० एवढी होती. जे भूमिहीन आहेत किंवा ज्यांच्या जवळ पाच एकरापेक्षा कमी शेती आहे व म्हणून ज्यांचे शेतीवर भागत नाही अशांची संख्या या कामगाराच्या संख्येपेक्षा दसपट आहे. अशा परिस्थितीत खेड्यातील बेकारीचा व उपासमारीचा व शहरातील आज उपलब्ध रोजगारीचा मेळ बसणे कसे शक्य आहे ? काही जुन्या पिढीचे लोक म्हणतात यापेक्षा पूर्वी होते ते बरे होते. सर्वांना नेमून दिलेले काम होते व पूर्ण नाही तरी अर्ध्या भाकरीची तरी शाश्वती होती ! पण हा विचार अव्यवहार्य आहे इतकेच नव्हे तर तो चुकीचा आहे.

पूर्वीची ग्रामीण अर्थव्यवस्था सरंजामी हितसंबंध व सामाजिक विषमतेच्या पायावर उभी होती. जातीव्यवस्था वर्णव्यवस्था हा त्यांचा आधार होता व ही जातीयव्यवस्था जन्मावर आधारीत होती. प्रत्येकांचा व्यवसाय जन्मावर ठरत असे कोणालाही तो व्यवसाय, काम, सोडण्याचा, दुसरा व्यवसाय शोधण्याचा व स्वतःचा विकास करण्याचा, जीवनात बदल करण्याचा अधिकार नव्हता. समाजात उच्च व नीच असे उघड भेद होते व कोणालाही पायरी सोडून वागण्याची परवानगी नव्हती. समाजाने लादलेली गुलामगिरी होती. व म्हणूनच जेव्हा लोकांना शिक्षण मिळू लागले महात्मा जोतीबा फुले, शाहु महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार त्यांच्या कानावर पडू लागले तेव्हा त्यांचा स्वाभिमान जागृत झाला, परंपरागत कामासाठी मिळणारी चतकोर भाकर त्यांना कडुवाटू लागली व त्यांनी स्वेच्छेने ती कामे सोडली. त्या भाकरीचा मोह सांडला उपासमार झाली तरी चालेल पण ताबेदारी करणार नाही असा निर्धार त्यांनी केला व अशा तऱ्हेने औद्योगिक क्रांतीमुळे मोडकळीस आलेल्या गांव गाड्यास त्यांनी एक शेवटला धक्का दिला. अशा या गांव गाड्याचे समर्थन कोण करील ? त्याचे पुनरुज्जीवन करा असे कोण म्हणेल ? तेव्हा भूतकाला-तील ह्या गोष्टी इतिहासात जमा झाल्या आहेत व आपल्यासमोर आपला भविष्य--काल घडविण्याचे प्रचंड प्रेरक आव्हान उभे आहे.

परंतू हे काम सोपे नाही. खेड्यातील श्रमजीवी वर्गाच्या प्रगतीच्या सर्व वाटा रोखून स्वातंत्र्यानंतर पुष्ट झालेला भांडवलदार वर्ग उभा आहे. हा वर्ग धूर्त आहे त्याची भाषा लोकशाही व समतेची आहे, परंतु जुनाट जातीवादाच्या अहंकाराचा व द्वेषाचा आपल्या स्वार्थासाठी बिनदिक्कत वापर करण्यात त्याला काहीच वाटत नाही. त्याच्या जवळ संपत्तीचा जोर आहे व सत्तेची मस्ती आहे. या वर्गाचे वर्चस्व संपविल्याशिवाय श्रमजीवी वर्गाला आपला विकास साधणे कदापि शक्य नाही. परंतु हे वर्चस्व संपवायचे कसे ?

आजच्या खेड्यातील शोषक वर्गाच्या हातात सोसायटचा, बँका, कारखाने तसेच ग्रामपंचायती, जिल्हापरिषदा व सत्तेची व पैसा मिळविण्याची अनेक साधने असली तरी त्याचा मूळ आधार त्यांच्याकडे शेतीचे केन्द्रीकरण आहे. पुर्वी ते सरजाम-दाराच्या हातात होते. आता ते पैसेवाल्याकडे आले आहे. जमिनीची असणारी ही मक्तेदारी मोडणे, गैरहजर व स्वत: श्रम न करणाऱ्या बड्या लोकाच्या ताब्यातून ती काढून घेणे व प्रत्यक्ष कष्ट करणाऱ्या भूमिहीन व लहान शेतकऱ्यांना त्याचे वाटप करणे हे पहिले महत्वाचे कार्य आहे. यालाच जोडून या भांडवलदार वर्गाची सोसायटचा ते बँका, साखर कारखाने व इतर उद्योग धंद्यावर असलेली मक्तेदारीची पकड नष्ट करणे हे सुद्धा अत्यंत महत्वाचे कार्य आहे. ह्यामुळे लहान शेतकरी, भूमिहीन व छोटा कारागीर वर्ग याला स्वस्त दरात कर्ज मिळण्याची व त्यांना त्यांच्या मालाचे योग्य दाम मिळण्याची शाश्वती निर्माण होईल.

भांडवलदार वर्गाचे मक्तेदारीचे अजून एक मोठ्याचे ठिकाण म्हणजे पाणी आहे. सरकारच्या जलसिंचन ' इरिगेशन ' योजनाचा सर्वात अधिक लाभ हा छोटासा वगत्र उपटतो जास्तीत जास्त शेतकऱ्यांना किमान एक पिकाची हमी देणारी पाणी वाटपपद्धती व पीकपद्धती, समानतेच्या तत्वावर या निसर्गाच्या देणगीचा उपयोग, यासाठी झगडणे आवश्यक आहे

शेवटी शासनाच्या एकंदर नियोजनाविरुद्ध ही संघर्ष करावा लागेल. य' महाराष्ट्रात पाण्याचे समान वाटप केले तर निम्मी जमीन भीजू शकते. असे सरकारी तज्ञांचे मत असतांना आज फक्त ११-१२ टक्के जमिनीलाच पाणी मिळते. अनेक जलसिंचनाच्या योजना पैशाअभावी अर्धवट किंवा धूळ खात पडल्या आहेत यासाठी केन्द्र सरकारच्या नियोजनात बजेटमध्ये सर्वात प्रथम तरतूद केली पाहिजे. शतीला पाणी मिळाले तर उत्पन्न तर वाढेलच परंतु खेड्यात रोजगारही वाढतील. वाटपासाठी अधिक जमीन मिळेल, कारखानदारीला नविन व मोठी बाजारपेठ मिळेल व पाण्यासाठी ग्रामीण जनतेची होणारी भयंकर विवंचना कमी होईल.

कामाचा हक्क किंवा रोजगार हमी योजना शेती अर्थव्यवस्थेत हे जे बदल अत्यंत आवश्यक आहेत त्या उपाय योजनेची एक कडी आहे, महत्वाची कडी आहे. जमिनीचे कितीही न्याय्य प्रमाणावर वाटप केले तरी त्यातून सर्वांची जमिनीची भूक भागविली जाऊ शकणार नाही. काहींना दुसरा उद्योग लागेलच. त्यासाठी आजच्या परिस्थितीत आवश्यक व जगू शकणाऱ्या खेड्यातील गृहउद्योगांना प्रोत्साहन, मदत संरक्षण देणे हे सरकारचे पहिले काम आहे. शिवाय नविन मोठे उद्योग आजच्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात काढले पाहिजेत याचा महत्वाचा फायदा म्हणजे खेड्या-तील श्रमिक नविन यंत्रतंत्राचा माहितगार बनेल व कुठेही जाऊन काम करण्याची

त्याची कुवत वाढेल सिवाय त्याला खेड्याच्या तुलनेत अधिक चांगला रोजगार मिळल, व हे काहीच पदरी पडले नाहीतर त्याला रोजगार हमी योजनेचा आधार पाहिजे.

खेड्यातील श्रमजीवी वर्गाची, भूमिहीन, शेतमजूर व लहान शेतकरी या बहूसंख्य जनतेची लढाई यासर्व गोष्टीसाठी आहे. सर्व प्रकारच्या, सर्व क्षेत्रात, पिळ–वणूक करणाऱ्या सत्ताधारी भांडवलदार वर्गाची मक्तेदारी, त्याचे वर्चस्व नष्ट करण्याचा त्याने कष्टकरी वर्गाची केलेली कोंडी फोडण्याचा व पुढे जाण्याचा, स्वतःचा विकास करण्याचा,, याशिवाय दुसरा मार्ग नाही. ही लढाई समाज बदलण्याची लढाई आहे. समतेची, स्वाभिमानाची व खऱ्या स्वातंत्र्याची लढाई आहे. हे आपले अंतिम ध्येय आहे व आजचे छोटे छोटे लढे म्हणजे महासागरात मिळणाऱ्या नद्याप्रमाणे शेवटी त्या ध्येयापर्यंत जाणारे लढे आहेत या जाणीवेने ते लढे लढले पाहिजत, तरच त्यांना अर्थ प्राप्त होईल, तरच त्याचे चीज होईल.

# रोजगार हमी कायदा–पार्श्वभूमी

रोजगार हमी योजनेला महाराष्ट्र विधान सभेने १५ ऑगस्ट १९५७ रोजी कायदेशीर स्वरुप दिले व या योजनेला राष्ट्रपतीची मान्यता १ ऑक्टोबर १९७८ रोजी मिळाली. तेव्हांपासून म्हणजे गेली आठ वर्षे हा कायदा अस्तित्वात आहे. प्रत्यक्षात मात्र हा कायदा येण्यापूर्वीही कित्येक वर्षे रोजगार हमी योजना अस्तित्वात होती.

ग्रामीण भागातील बेकारांना काम द्यावे या कल्पनेला जुलै १९६९ कांही खेड्यांच्या पातळीवर अत्यंत मर्यादित स्वरुपात आकार देण्याचा प्रथम प्रयत्न झाला. हे वर्ष भारताच्या राजकारणात महत्वाचे आहे. याच वर्षी कॉंग्रेसचे विभाजन झाले. त्यापूर्वीच्या घडामोडी लक्षात घेण्यासारख्या आहेत. १९६५ व १९६६ साली देशात प्रथमच अन्नाच्या प्रश्नावर दंगे झाले व अनेक लोक शासनाच्या दडपशाहीला व उपासमारीला बळी पडले. लोकांच्या या असंतोषाचे पडसाद १९६७ व १९६८ च्या निवडणुकीत पडले. अनेक राज्यात कॉंग्रेसचा पराभव झाला. स्वातंत्र्यानंतरच्या वीस वर्षात प्रथमच कॉंग्रेसच्या सत्तेला एवढे मोठे आव्हान मिळाले हे आव्हान केवळ सत्तेलाच नव्हते तर एकंदर नियोजनाला होते. या नियोजनातून देशातील सर्वसामान्य लोकांचे गरीबी, बेकारी व दारिद्र्याचे प्रश्न सुटलेले नाहीत व ही गोष्ट लोक आता सहन करण्यास तयार नाहीत याचाच जणू हा इशारा होता. या पार्श्वभूमीवर २४ जुलै १९६९ रोजी महाराष्ट्र शासनाने एक ठराव करुन मान्य केले की आतापर्यंतचा रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या शासकीय योजना सर्वांना कामाची संधी देण्याच्या

दृष्टीने अपयशी झाल्या आहेत. ठरावात पुढे असे म्हटले की, महाराष्ट्रात बेकारांची एक मोठी संख्या आहे व ती प्रतिदिनी वाढत आहे. औद्योगिक भागातील बेकारांना काम देण्याचा प्रश्न बराच मोठा आहे. शासनाच्या मर्यादित साधनांनी तो प्रश्न सोडविणे शक्य नाही. शिवाय या प्रश्नाची एक सामाजिक आर्थिक गुंतागुंतही आहे.

रोजगार हमी योजनेंवरचा खर्च म्हणजे केवळ पैशांची उधळपट्टी होय अशा आक्षेपांना उत्तर देत शासनाने सांगितलें कीं,

" समाजाच्या या (बेकार) विभागाच्या नैराश्यातून जर अविचारी कृत्ये घडली तर त्याचे होणारे सामाजिक परिणाम व त्यामुळे राष्ट्राच्या सुरक्षेला मिळणारे आव्हान या गोष्टी त्यापेक्षा कितीतरी अधिक महाग व धोकादायक होणार आहेत. या उलट अशा रोजगार हमींच्या कामातून अशी साधने निर्माण होऊ शकतील जी समाजाला उपयोगी पडतील. "

१९६९ साली मोजक्या पांच खेडयात एकूण ५००० रुपयाच्या वार्षिक बजेटने सुरु केलेल्या या योजनेला शासनाने १ एप्रील १९७२ पासून १५ कलमी कार्यक्रमाच्या अंतर्गत राज्यव्यापी स्वरुप देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पुढची दोन वर्षे राज्यभर मोठा दुष्काळ पडला व त्यामुळे दुष्काळ निवारणाचे काम हेच शासनाचे मुख्य काम झाले. १९७४ साली शासनाने स्थगित केलेल्या योजनेला पुन: जीवित केले व त्याला आजचा आशय व आकार दिला. तो देण्यात १९७२–७३ साली राज्यभर शेतमजुरांनी जी जागृती दाखविली, संघटना बांधली व काम मिळण्यासाठी व कामाच्या जागी सवलती मिळविण्यासाठी जो नेटाचा संघर्ष केला त्याचा वाटा फार मोठा आहे. महाराष्ट्र शासनाला खेडयातील श्रमिक जनतेच्या या नव्या जागृतीची जाणिवांची व त्यांच्या संघटित सामर्थ्याची नोंद घेणे भाग होते. म्हणूनच २० डिसेंबर १९७४ रोजी सदनात या योजनेसंबंधी निवेदन करतांना महाराष्ट्र शासनाने सांगितले की,

" खेडे भागातील बेरोजगारी आणि अपुरा रोजगार ही आपल्या आर्थिक गरजांची ठराविक (खास) वैशिष्टये आहेत. आपल्या कृषी उत्पादनावर याचा अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे हा प्रश्न तातडीने सोडविणे आवश्यक आहे. म्हणूनच रोजगार हमी योजना ही केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर सर्व देशासाठी एक अत्यंत महत्वाची अशी योजना आहे. खेडे भागातील बेरोजगारी म्हणजे आपल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला एक गंभीर धोकाच आहे ही बाब लक्षात घेता ग्रामीण रो ह. यो.चे महत्व वादातीत आहे. आणखी एका कारणाने या योजनेला राष्ट्रीय महत्व प्राप्त झालेले आहे. कारण ही योजना संख्येने सर्वात मोठया असलेल्या परन्तु अत्यंत दुर्बल अशा घटकांचे म्हणजेच भूमिहीन मजुरांच्या हिताचे संरक्षण करणारी अशी योजना आहे. ही योजना पूर्णपणे यशस्वी व्हावी असेच या सदनातील सर्व पक्षांना वाटते.

त्याचप्रमाणे प्रशासकीय अकार्यक्षमता, निधीची कमरता, राजकीय मतभेद व सामाजिक कार्यकर्त्यांची उदासीनता यामुळे ही योजना बारगळू नये किंवा अपयशी होऊ नये असेच या सदनाचे मत आहे " ( E. G. S. Compendium of Orders, Govt. Press P. 838 1982 )

रो. ह. यो. मुळे शेतीला मजूर मिळणार नाही या भितीचा परामर्ष घेत हे निवेदन म्हणते,

" रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीचा शेतीच्या कामावर व शेती विकासावर अनिष्ट परिणाम होऊ नये अशी या सदनाची कळकळीची इच्छा आहे. ग्रामीण भागात काम नसलेले किंवा अपुरा रोजगार असलेले भूमिहीन मजूर व छोटे शेतकरी फार मोठ्या संख्येत आहेत. त्यामुळेच शेतीवर या योजनेचा कांही परिणाम होईल अशी भिती या सदनाला वाटत नाही. म्हणून या संभाव्य परिस्थितीचा वारंवार उल्लेख अनावश्यक आहे. आपल्या राष्ट्रीय जीवनासाठी शेतीचे महत्व अनन्य साधारण आहे. त्यामुळेच कोणत्याही योजनेचा त्यावर अनिष्ट परिणाम होता कामा नये. रोजगार हमी योजनेचा तर मुळीच होऊ नये अशीच या सदस्यांची इच्छा आहे. पण या बरोबरच किमान शतमजुरीचे तत्व व मजुरासाठी मिळविलेला कामाचा हक्क याचाही भंग होता कामा नये, असे या सदनाचे मत आहे. यासाठी कलेक्टरने या दोहोमध्ये समतोल साधावा व योजनेचा प्रत्यक्ष अंमलबजावणीचा दोहोपैकी एकावरही परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी असे असे या सदनाचे मत आहे. शेतीच्या कामासाठी मजुरांची आवश्यकता लक्षात घेऊन रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी काम देण्यास नकार दिला तरी ज्यांना काम मिळू शकत नाहीं अशांना शेतीच्या कामात पूर्णवेळ काम व किमान मजूरी मिळेल याची दक्षता जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे. "

२० डिसेंबर १९७४ रोजी त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी सदनात केलेले निवेदन त्यापूर्वी शासनाने जी भूमिका घेतली होती त्याच्या संदर्भात व त्यानंतर शासनाने भूमिकेत जे बदल केले व आज करु पाहताहे त्याच्या संदर्भात महत्वाचे आहे. जुलै १९६९ ला शासन अजून चांचपडत होते- नोव्हेंबर ६९ मध्ये तासगांव (जि. सांगली) ब्लॉकच्या दहा गांवात याचा विस्तार करण्यात आला व मजूरीचे दर त्याच कामासाठी इतरत्र जे दर असतील त्यापेक्षा १० टक्के कमी असावेत असे आदेश देण्यात आले. नोव्हेंबर ७० मध्ये या योजनेचा पुन: विचार करत असतांना असे स्पष्ट करण्यात आले की, ही योजना म्हणजे कामाचा हक्क नव्हे किंवा 'डोल' फुकट मदतही नव्हे. ही बेकारांना मदत देणारी मात्र योजना आहे. मजूरीचे दर इतर कामापेक्षा ५ टक्के कमी असावेत हे बंधन टाकण्यात आले. मार्च १९७२ मध्यें या योजनेला राज्यव्यापी स्वरुप देतांना काम हा अधिकार आहे असे मान्य न करता

शेतीत किंवा नित्याच्या सरकारी कामात रोजगार न मिळाल्यास काम देण्याची सोय करण्यात येईल असे सांगण्यात आले. त्याचबरोबर मजुरीचे दर शेतीचा हंगाम नसतांना मजुरीचे जे कमीत कमी दर असतील ते राहतील व जे काम दिले ते करावे लागेल व अंतर कितीही असो जेथे काम दिले तेथे जावे लागेल असे स्पष्ट करण्यात आले.

येथपर्यंन्तची शासनाची ही काम देणे म्हणजे मजुरांवर जणू कांही उपकार करणे आहे ही ताठर भूमिका व १९७४ चे निवेदन याच्यात जे अंतर आहे ते ७२–७४ च्या भीषण दुष्काळाने व त्या दुष्काळात मजुरांनी केलेल्या प्रखर आंदोलनाने निर्माण केलेले अंतर आहे. म्हणूनच १९७४ च्या निवेदनांत मजुरांच्या कामाच्या गरजेवर भर आहे व हमी योजना राबविली तर शेतीला माणसे मिळणार नाहीत या प्रचाराला उत्तर आहे. तसेच या निवेदनांत मजुरांना शेतीवर व हमी कामावर किमान वेतन हे मिळालेच पाहिजे यावरही भर आहे.

१९७२–७३ च्या भयानक दुष्काळ, हरीत क्रांतीचा डोलारा महाराष्ट्रात किती ठिसूळ पायावर उभा आहे याची तीव्र स्वरुपांत आठवण करुन देणारी घटना होती. दुष्काळाची तीव्रता ओसरत असतांना शासनाने ६ ऑगस्ट १९७३ ला एक सर्क्यूलर काढले. त्यात त्याने दुष्काळाच्या काळात दररोज ४० लाखापेक्षा अधिक लोक कामावर होते असे सांगून पुढे म्हटले कीं,

" जलसिंचनाच्या मर्यादित सवलती व राज्यात मोठ्या प्रमाणावर कोरडवाहू शती यामुळे शेती संबंधित उद्योगात ग्रामीण मजुरांना समाविष्ट करुन घेण्याची क्षमता मर्यादित आहे "

कामाची गरज असलेल्या सोळा लक्ष मजुरांनी आपली नांवे नोंदविल्याचा उल्लेखही त्या सर्क्युलरमध्ये आहे. एवढ्या प्रचंड प्रमाणावर लोकांना नियमित रोजगार पुरवावा लागेल हे जाणूनच शासनाने पुढच्याच वर्षी म्हणजे ४ जून १९७५ रोजी निरनिराळ्या व्यावसायिकांवर, धंद्यावर व नौकऱ्यांवर एक विशेष रोजगार हमी कर लावला व त्याच्या उत्पन्नातून रोजगार हमी योजनेचा खर्च भागविण्याची तरतूद केली. १ ऑक्टोबर १९७८ रोजी झालेला रोजगार हमी कायदा या एकूण अनुभवातून आलेला कायदा आहे.

## रोजगार हमी कायदा–रुपरेषा

रोजगार हमी कायद्यातील कांही महत्वाच्या गोष्टींचा परामर्ष घेणे आवश्यक आहे. कारण त्याच्यावरच रोजगार हमी योजनेचा डोलारा उभा आहे.

**कामाचा हक्क** १) पहिला महत्वाचा प्रश्न कामाच्या हक्काचा आहे. ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार पुरविण्याच्या कांही योजना केन्द्र सरकारने अलीकडे जाहीर केल्या आहेत. इतर कांही राज्यातही त्या दिशेनें प्रयत्न चालू आहेत. महाराष्ट्र राज्याच्या रोजगार हमी कायद्याचा विशेष हा की त्यानें रोजगाराची हमी देतांना भारतीय घटनेंच्या ४१ व्या कलमांचा उल्लेख केला आहे व घटनेंचे ते मार्गदर्शक तत्व आमलात आणण्याच्या दिशेनें एक पाऊल म्हणून रोजगाराच्या हक्काची मांडणी केली आहे कामाचा हक्क, त्याची कायदेशीर हमी हा ह्या कायद्याचा गाभा आहे. हा हक्क नाकारला तर कोर्टात जाता येते व शासन यंत्रणेंला जाब विचारता येतो. कोर्टाकडून काम मागणाऱ्याला दिलेच पाहिजे हा आदेश घेतां येतो ही मुख्य तफावत या योजनेत व मजुरांना काम पुरविणाऱ्या केन्द्रीय व इतर योजनांमध्यें आहे. काम देणें ही कोणा अधिकाऱ्याची, तहसीलदार, कलेक्टर, ज्युनिअर इंजिनिअर किंवा एक्झीक्युटिव्ह इंजिनिअरची मेहरबानी नाही कोणी उपाशी मरते म्हणून दिलेली ही भिक्षा किंवा खैरात नाही. महाराष्ट्राच्या ग्रामीण श्रमिकाने लढून मिळविलेला हा एक अमुल्य अधिकार आहे व ती गोष्ट ह्या कायद्यात ग्रथित केली आहे.

२) या कायद्याची दुसरी महत्वाची मान्य केलेली गोष्ट म्हणजे श्रमाची प्रतिष्ठा ! श्रमाची समाजाच्या विकासाच्या दृष्टीने गरज ! रोजगार हमी कायदा म्हणतो की लोकांना काम देणे म्हणजे केवळ बेकार लोकांना समाजाच्या पैशाने जगविणे एवढाच अर्थ त्याचा नाही तर खेड्यातील मजुराच्या या श्रमातून उत्पादन वाढ व विकास यासाठी आवश्यक अनेक गोष्टीचे निर्माण करता येते. शासन जर या मजुरांना काम देते तर हे मजूरही दिवसभर घाम गाळून पाझर तलाव, नालाबंडींग जलसिंचन योजना, जमीनीचे सपाटीकरण, रस्ते, वनीकरण इत्यादी कामे करुन कायम स्वरुपाची समाजोपयोगी गोष्टी (assets) उभ्या करुन त्याची परत फेड करतात. तेव्हा यात कोणी कोणावर उपकार करतोय असे समजण्याचे कारण नाही.

३) तीसरे या कायद्याने सुरवातीसच मान्य केलें आहे की ग्रामीण भागात शेती किंवा इतर धंद्यात ज्याला समावून घेणे शक्य नाही असा एक Surplus– वरकड मजूरवर्ग अस्तित्वात आला आहे, त्याला कायम स्वरुपात कामाची गरज आहे. व हा कायदा त्यांना काम देण्यासाठी करण्यात आला आहे. पुढे चालून कायद्यात असेही म्हटले आहे की शेतीच्या हंगामाच्या काळात जेव्हा शेतीला मजुरांची गरज असेल तेव्हा त्या गरजा पूर्ण केल्या जात आहेत हे पाहूनच रोजगार हमीची कामे काढावीत तशाच तऱ्हेची सूचना योजनांतर्गत नियमित कामाच्या गरजासंबंधी केलेली आहे. परंतु हे अपवादात्मक व तात्पुरते प्रकार खेड्यातील कायम बेकारीच्या समस्येचे गांभीर्य कमी करत नाहीत. कायदा करण्याचा मूळ हेतुच या कायम बेकारांना काम देणे आहे हे स्पष्टपणे मांडले आहे.

४) या कायम बेकारांच्या जोडीला खेडयांत असा एक मोठा वर्ग आहे ज्याला केवळ हंगामी काम मिळते किंवा ज्याच्या जवळ थोडीशी शेती आहे व वर्षांचे सहा–आठ महीने बेकारच राहावे लागते. रोजगार हमी कायदा अशा भूमिहीन किंवा लहान शेतकऱ्यांसाठी, अर्धबेकारांसाठीसुद्धा आहे.

५) कामाच्या हक्काच्या संदर्भात शेवटचा महत्वाचा मुद्दा बेकारभत्याचा आहे. " काम द्या नाहीतर भत्ता द्या " ही घोषणा या कायद्याने तत्वत: मान्य केली आहे व त्यासंबंधी तपशीलवार नियम केले आहेत.

ह्या झाल्या कायद्याच्या गोष्टी ! गेल्या आठ वर्षांचा अनुभव काय सांगतो पुढे त्याचाही आढावा शेवटी घ्यावाच लागेल.

## किमान वेतन :

रोजगार हमी कायद्याने दुसरे महत्वाचे अंग म्हणजे मजुरांसाठी ठरविलेलें किमान वेतन ! हे वेतन जेवढे काम तेवढे दाम या तत्वावर निश्चित केले गेलें आहे, कामाचे अनेक प्रकार आहेत व प्रत्येक प्रकारच्या कामाचें दर शासनाने निश्चित केले आहेत. शासनाचे म्हणणे असे की सात तास काम केले तर ठरलेल्या दराप्रमाणे मजुराला किमान वेतन मिळू शकेल.

या किमान वेतनासंबंधी चांगली गोष्ट ही की हें वेतन स्त्री पुरुषांसाठी समान आहे. सारख्या कामासाठीही स्त्रीयांना कमी मजुरी देण्याची खेडयाची जुनी परंपरा आहे. रोजगार हमी कायद्याने ही परंपरा मोडली आहे.

दुसरी चांगली गोष्ट ही की मजुरीचे जे दर कायद्याने ठरविले ते सर्व राज्यासाठी सारखे ठरविले. नंतर कोर्टाच्या आदेशानें यात फरक करण्यात आला ही गोष्ट निराळी !

मजुरीच्या बाबतीत शासनाचा दृष्टीकोन पूर्वीपासून ती कमी ठेवण्याचा राहीला आहे. कायदा येण्यापूर्वीही इतर मजुरांना जी मजुरी पडते त्यापेक्षा रोजगार हमी कामावर १० टक्के व नंतर ५ टक्के कमी मजुरी द्यावी अशी तरतूद शासनाने केली होती. या कायद्यातही शासनाने तशीच भूमीका घेतली आहे व शेतीवर काम करणाऱ्या मजुरांना सर्वात शेवटच्या झोनमध्ये (म्हणजच दुष्काळी प्रदेशात) जी मजुरी पडते ती मजुरी रो. ह. यो. च्या कामावरच्या मजुरांना द्यावी असे मांडले आहे.

## इतर सवलती :

या कायद्याने मजुरांना इतर कांही सवलती दिल्या आहेत. उदाहरणार्थ–

१) रोजगार हमीवर काम करणाऱ्या स्त्री कामगाराला बाळंतपणासाठी एक महीन्याची पगारी रजा मिळू शकेल. परन्तू त्याला अट अशी की तीनें त्यापुर्वीच्या वर्षभरात रोजगार हमीच्या कामावर कमीत कमी १५० दिवस काम केले पाहिजे.

२) रोजगार हमी कामावर काम करणाऱ्या पुरुष किंवा स्त्री मजुराला जर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया करवून घतली असेल तर वैंद्यकीय शिफारसीवर १४ दिवस पगारी सुटी घेता येईल.

३) रो. ह. यो. वर काम करतांना जर कांही दुखापत झाली तर त्या मजुरास आवश्यक उपचाराची राहण्याची व खाण्याची व्यवस्था शासन करील. जर त्या मजुराला दवाखान्यात राहावे लागले तर जितके दिवस तो तेथे राहील तितक्या दिवसांची अर्धी सरासरी मजुरी त्याला मिळेल.

४) जर काम करतांना मजुराचा मृत्यु झाला तर त्याच्या वारसाला पांच हजार रुपये शासन देईल.

५) जर दुखापतीमुळे मजुराचा कोणत्याही अंगाला कायम स्वरुपाची इजा झाली तर त्याला ठरलेल्या नियमाप्रमाणे मोबदला दिला जाईल.

६) मजुरांना कामाच्या जागी हत्यारे पुरविण्याची जबाबदारी शासनाची आहे. जर मजुरांनी स्वतःची औजारे आणली तर त्याला त्याचे भाडे दिले जाईल, नंतर केलेल्या नियमानुसार हे भाडे रोजचे २५ पैसे ठरले आहे. शिवाय याची धार करण्यासाठी रोजचे १० पैसे द्यायचे ठरले आहे.

रोजगार हमी कायद्याच्या तहत केलेंल्या नियमाद्वारे इतरही कांही सवलती शासनाने दिल्या आहेत. उदाहरणार्थ :

७) कामावर येणाऱ्या मजूर स्त्रीयांच्या मुलांचा साभाळ करण्यासाठी पांच मुलांच्या मागे एक त्यांना सांभाळणारी बाई अशाप्रकारे व्यवस्था केली पाहिजे.

८) कामावरील मजुरांना कामाच्या जागी पिण्याचे पाणी, जेवणासाठी व विश्रांतीसाठी शेड व तात्कालिक उपचारासाठी औषध पेटीची व्यवस्था केली पाहिजे.

## रोजगार हमी योजना–देखरेख समित्या

प्रस्तुत कायद्यात प्रत्येक पातळीवर रो. ह. यो. च्या कामाची देखरेख करण्यासाठी समित्यांची रचना करण्याची व वेळोवेळी शासनाला सूचना करण्यासाठी समित्यांची रचना करण्याची महत्वाची तरतूद आहे. या तरतुदीप्रमाणे राज्य पातळीवर एक रो. ह. कौन्सील–समिती स्थापन केली जाईल. त्याचा एक अध्यक्ष, एक चेअरमन व २६ पर्यंतचे सभासद राहतील. या सर्वांची नेमणुक राज्य सरकार करील ही समिती रो. ह. यो. च्या कामावर देखरेख करील व त्यासंबंधी शासनाला सूचना देईल शिवाय ही समिती रो. ह. यो. चे वेळोवेळी मूल्यांकन करील. विशिष्ट प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास गटांची नेमणूक करील व या पलिकडे जाऊन महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेसंबंधी व विशेष करुन ग्रामीण श्रमिकासंबंधी उपयुक्त माहिती व आकडेवारी जमा करील.

याचप्रकारे राज्य सरकार प्रत्येक जिल्हयासाठी व पंचायत समितीसाठी समित्या कायम करील. या प्रत्येक समितीवर मागासवर्गाचे दोन प्रतिनिधी व काम करणाऱ्या मजुरांचे किंवा त्यांच्या रजिस्टर्ड युनियनचे दोन सभासद घेतले पाहिजेत.

## रोजगार हमी कामांचे नियोजन व आंखणी

१) रो. ह. कायद्याची अंमलबजावणी करण्याची मुख्य जबाबदारी जिल्हाधिकाऱ्याची राहील व इतर सर्व अधिकारी त्याच्या हाताखाली काम करतील असे कायद्यात स्पष्ट केले आहे.

२) विभागीय पातळीवर हे काम एका खास असिस्टंट कमिशनरकडें सोपविले जाईल व तो जिल्हा कलेक्टर्सना व इतर अधिकाऱ्यानी वेळोवेळी योजनेच्या अंमलबजावणीसाठी सूचना देऊ शकेल.

३) रो. ह. यो. ची चांगल्या प्रकारे अंमबजावणी करण्यासाठी गरजू मजुरांची नोंदणी करुन जिल्हयासाठी उपलब्ध मनुष्य बळाचे बजेट तयार केले जाईल.

४) या सर्व मजुरांना पुरवावयाच्या कामाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी कलेक्टरची आहे. त्यासाठी तो प्रत्येक पंचायत समितीं क्षेत्रांत निसर्ग संपत्ती व मनुष्यबळ या आधारे स्थानिक विकासाच्या कोणत्या योजना घेणे शक्य आहे. त्याची माहिती घेईल व जिल्हयासाठी एक प्लॅन तयार करील व हा प्लॅन जिल्हा रो. ह. समितीकडून मंजूर करवून घेईल. जिल्हा प्लॅनची नील प्रत मंजूर करतांना पंचायतसमिती पातळीवरच्या कमिटीचे मत लक्षांत घेतले जाईल.

४) नील प्रत तयार करतांना केवळ उत्पादक स्वरुपाच्या कामाचाच विचार केला जाईल (अतिवृष्टी, अवर्षण किंवा अशींच नैंसर्गीक आपत्ती आल्यास ही अट शिथील करता येईल) पाणलोट क्षेत्राच्या आधारावर जमीनीचा विकास हे उत्पादक कामाचा मुख्य आधार राहील.

५) शक्य तो काम मागणाऱ्या मजुराच्या राहत्या गांवापासून पांच किलो मिटर अंतराचा आंत काम दिले जाईल. ते शक्य नसेल तर पंचायत समितीच्या क्षेत्रात. तेही शक्य नसेल तर लगतच्या पंचायत समिती क्षेत्रात नसता जिल्हयांत कुठेही काम दिले जाईल.

६) रो ह. योजनेची सर्व अकुशल स्वरुपाची कामे डिपार्टमेन्टमार्फत घेतली जातील त कंत्राटदारांना मज्जाव राहील.

७) मजुरांना कामाचे पेमेन्ट दर आठवडयाला व कसल्याही परिस्थितीत पंधरा दिवसात केले गेलेच पाहिजे.

## रोजगार हमी कायदा—त्यानुसार कार्यवाही कशी करावी ?

### १) कामगार म्हणून नोंदणी : ओळखपत्र घेणे

रोजगार हमी योजनेखाली सर्वात प्रथम जर कोणत्या गोष्टीची काळजी घ्यायची आवश्यकता असल तर ती खेडयातील मजूर किंवा गरजू शेतकऱ्यांने आपल्या नांवाची नोंदणी करण्याची आहे. ज्याचे वय १८ किंवा अधिक असेल त्याला काम मागण्याचा हक्क आहे. ज्या कुटुंबात कोणीच प्रौढ कमावती व्यक्ती नसेल तेथे १५ वर्षे वयाच्या मुलालाही नांव नोंदण्यासाठी अर्ज करता येईल. नोंदणी केली नसेल तर काम मागण्यास अडचणी येतील. शिवाय काम दिले नाही तर बेकार भत्ता मागण्याचा अधिकारही वापरता येणार नाही. नोंदणी झाल्यानंतर प्रत्येक कामगाराला ओळख पत्र मिळते ते जपून ठेवले पाहिजे. त्याशिवाय अलिकडे सरकारने प्रत्यक्ष साईटवर काम करणाऱ्या प्रत्येक मजूराला हजेरी पुस्तिका द्यायची व्यवस्था केली आहे या हजेरी पुस्तिकेत दर मस्टरमध्ये हजेरी व वेतन याची महिनेवार अशी पांच वर्षांची नोंद ठेवण्याची सोय आहे. त्या पुस्तिकांवर मजुराने आपला फोटोही लावायचा आहे. तेव्हा यासर्व गोष्टींची सुरुवात नांव नोंदणीने होते. ज्यानी आपले नांव नोंदविले नसेल त्याने तलाठी किंवा ग्रामसेवकाकडे जाऊन त्यासाठीचा छापील फॉर्म मागावा. तो जर मिळत नसेल तर साध्या कागदावर खालील मजकुर लिहुन अर्ज करावा व अज दिल्याची पावती घ्यावी. त्या अर्जावर त्याने ओळख पत्र दिले पाहीजे. जर त्याने देण्यास कुचराई केली तर फॉर्म भरल्याची पावती घेऊन तहसीलदाराकडे तक्रार करता येईल व नोंदणी करवून घेणे व ओळखपत्र मिळविणे दोन्ही कामे करवून घेता येतील.

नोंदणीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना (फॉर्म नं. १)

प्रति,

नोंदणी अधिकारी,

गांव......................तालुका....................

महोदय,

रोजगार हमी योजनेखाली रोजगार मागणारा म्हणून माझ्या नांवाची नोंदणी करावी अशी मीं आपणांस विनंती करतो. माझ्या संबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) नांव : ............................ २) पत्ता : ......................

३) अनुसुचित जात, जमात, विमुक्त किंवा भटक्या जमातीचा असल्यास त्या जाती / जमातीचे नांव.............................

४) पुरुष किंवा स्त्री.................... ५) वय.................

६) जमीन धारण करीत असल्यास किती हेक्टर ............

दिनांक..................

आपला विश्वासू

सही / अंगठा....................

## २) कामाच्या मागणीसाठी ‘ प्रोसीजर ’

नांवाची नोंदणी केल्यानंतर दुसरा महत्वाचा प्रश्न काम मिळण्याचा आहे. पूर्वी पांच पन्नास लोकांनी सामुहिक अर्ज केला किंवा मोर्चा काढला तरी भागत असे आता सरकारचा असा आग्रह आहे की, ज्याला काम पाहिजे असेल त्याने प्रत्येकाने वैयक्तिपणे स्वतंत्र अर्ज केला पाहिजे. असा अर्ज केला नाही तरी बऱ्याच ठिकाणी पूर्वीप्रमाणे कामावर घेतले जाते परन्तू सरकारवर तसे बंधन नाही व मजुरांची संख्या जशी वाढत जाईल तशी कायद्याची अंमलबजावणी कडक होत जाईल. तेव्हा अर्ज देणे आवश्यक आहे व अर्ज दिल्याची पावती घेणे तेवढेच आवश्यक आहे. नंतर भानगड नको ! कामाच्या मागणीचा अर्ज ह्यासाठीही आवश्यक आहे की, जर अर्ज देऊनही सात दिवसात काम दिले नाही तर त्या अर्जाच्या आधारावर बेकार भत्ता मागता येतो. काम मागायच्या अर्जाचे छापील फॉर्म तलाठ्याकडून किंवा तहसीलमधून घ्यावेत व ते त्यांनी देण्याची टाळाटाळ केली तर खालील नमुन्याप्रमाणे अर्ज करावा.

काम मागण्यासाठी करावयाच्या वैयक्तिक अर्जाचा नमुना (फॉर्म नं. ४)

प्रति,

समिती अधिकारी (तहसीलदार)

तालुका......................

किंवा

नोंदणी अधिकारी,

(तलाठी किंवा ग्रामसेवक)

गांव...................तालुका................

महोदय,

रोजगार हमी योजनेखाली मला रोजगार पुरविण्याची मी आपणास विनंती करतो. माझ्यासंबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) नांव.......................... २) पुरुष / स्त्री.....................

३) नोंदणी क्रमांक .................. ४) पत्ता.........................

मी हमी देतो की, समिती अधिकाऱ्याने निर्देशित केलेल्या कामावर मी किमान ३० दिवस काम करीन.

ठिकाण....................                                   आपला विश्वासू

दिनांक..................                  अर्जदाराची सही / अंगठा.........

असा अर्ज दिल्यानंतर सात दिवसाच्या आत संबंधित मजुराला त्याच्या गांवी कोणत्या कामावर जावे याची सूचना गेली पाहिजे असा कायदा आहे. त्याचबरोबर सरकारी अधिकारी जिल्ह्यात जेथे काम दाखवतील तेथे सात दिवसाच्या आत मजुराने रुजू झाले पाहिजे असाही कायदा आहे. जर त्याने त्या साईटवर जाण्यास नकार दिला तर त्याला तीन महिन्याकरिता बेकार भत्ता मागता येणार नाही. शेतीचा सीझन असेल तर अधिकारी काम नाकारू शकतात. कित्येक वेळेस असेही घडते की जेथे काम दाखविले तेथे काम घेणारा कोणीच अधिकारी नाही. अशा परिस्थितीत त्या गांवच्या सरपंचाकडून तसे प्रमाणपत्र घ्यावे. कधी असेही घडते की मजूर साईटवर जातात पण अधिकारी मजुरांची संख्या जास्त आहे म्हणून किंवा इतर कारणाने काम नाकारतात अशा स्थितीत त्या अधिकाऱ्याकडून लेखी घ्यावे व तहसीलदाराला तसा अर्ज करावा.

## तालुक्यातील मंजूर कामाची माहिती ठेवा

काम मागण्याच्या संदर्भात कार्यकर्त्यांनी तहसीलमधून किंवा जिल्हाधिकाच्या रो. ह यो विभागाकडून आपल्या तालुक्यात शासनाने Blue Print नील प्रतमध्ये कोणती कामे मंजूर करुन ठेवली आहेत हे जाणून घेणे महत्वाचे आहे. आपल्या भागात अपुऱ्या राहिलेल्या कामाचीही माहिती ठेवणे उपयोगी आहे. कारण मग अर्ज करतांना आपण प्रथम ती कामे द्या अशी मागणी करु शकतो. अर्थात जवळच्या कामावर मजुरांची संख्या पुरेशी असेल तर नाईलाजाने दूर जाण्याची तयारी ठेवायला पाहिजे.

जर कामाची जागा गांवापासून दूर असेल तर सरकार प्रवास खर्च म्हणून एकदा १० रुपये पर्यंत देईल. नंतर कामाच्या जागेवर राहण्यासाठी झोपडीची साधने तट्टर, बांबू, पिण्यासाठी पाणी, धान्य, औषधे, मुलांसाठी पाळणाघरे इत्यादी सर्व व्यवस्था शासनाने केली पाहिजे. अशा कँपवर मजुरांनी किमान एक महिना काम केले पाहिजे. काम देण्याची ती एक अट आहे.

## ३] बेकार भत्ता –

समजा तुम्ही कामासाठी रीतसर अर्ज केला व पावती घेतली परन्तू त्यांनी सात दिवस झाले तरी त्यांनी तुम्हाला काम दाखविले नाही तर अजून सात दिवस वाट पाहून पुढीलप्रमाणे अर्ज करावा.

बेकार भत्त्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना (फॉर्म नं. ८)

१) नांव, २) पत्ता, ३) पुरुष किंवा स्त्री, ४) वय
५) नोंदणी क्रमांक ६) नोंदणीचा दिनांक ७) रोजगारासाठी अर्ज कोणत्या तारखेस व कोणाला दिला, ८) किती दिवसासाठी बेरोजगार भत्त्याची मागणी केली आहे ? ९) बेरोजगार भत्त्याच्या मागणीच्या कालावधीच्या प्रारंभाची तारीख,
मी·································राहणार·····························
गांभीर्यपूर्वक असे जाहीर करतो की, या अर्जाद्वारे ज्या कालावधीसाठी मी बेरोजगार भत्त्याची मागणी केली आहे त्या कालावधीत मी कोठेही रोजगारावर नव्हतो आणि याद्वारे अशी हमी देतो की, उपर्युक्त कालावधीत किंवा त्यापैकी कांही काळात मी रोजगारावर े असे सिद्ध झाल्यास त्या कालावधीसाठी मिळालेली बेरोजगार भत्त्याची रक्कम शासनास परत करीन.

दिनांक : अर्जदाराची सही···············
किंवा अंगठ्याची निशाणी

**सूचना – १)** कामासाठी दिलेल्या अर्जाची पावती या सोबत जोडावी.
२) जेथे काम दाखविले गेले तेथे काम मिळाले नसेल तर तेथील सरपंच किंवा संबंधित अधिकाऱ्याकडून घेतलेल्या पत्राची नक्कल सोबत जोडली.
३) जर बेकारी भत्ता कांही कारणानें नामंजूर केला असेल तर त्याविरुद्ध १५ दिवसाच्या आंत उपविभागीय अधिकाऱ्याकडे अपील करावे.
४) त्यानेही नकार दिल्यास हायकोर्टात बेकार भत्ता देण्यास भाग पाडणारी याचिका (Writ of Mendamus) दाखल करावी.

## कांही महत्वाचे शासकीय ठराव [जी.आर.] सूचना व आदेश

रोजगार हमी कायद्याच्या या महत्वाच्या तरतूदी आहेत. त्याशिवाय अनेक छोट्या मोठ्या प्रश्नावर शासनाने वेळोवेळी ठराव केले आहेत आणि ते शासनाला बंधनकारक आहेत. यापैकी जे ठराव मजुरांच्या हिताच्या दृष्टीने जाणून घणे आवश्यक आहेत, त्याची संक्षिप्त माहिती खाली देत आहोत. आपल्या हक्काचा प्रश्न आला तर हे ठराव उपयोगी पडण्यासारखे आहेत.

**१] नोंदणी :** रोजगार हमी नियम १९७९ मधील नियम ५ अनुसार रोजगारासाठी नांवाच्या नोंदणीसाठी नमुना क्र. १ मधील तपशील एका अर्जात देऊन नोंदणी अधिकाऱ्यांकडे देऊन करून घेता येते. यासाठी विहित नमुन्यातच अर्ज असावा असा

निर्बंध नाही. जर अर्ज लिहिता येत नसेल तर तोंडी माहितीवरही नांव रजिस्टर केले पाहिजे. ”

(महाराष्ट्र रो. ह. यो. नियम जानेवारी १९७५ कलम–५)

## २] नोंदणी नसलेल्यांना काम मिळणेबाबत.

रोजगार हमी कायद्यात नोंदणीची तरतूद आहे. परन्तू ती काम देण्याबाबतची पूर्व अट नाही आणि म्हणून नोंदणी न केलेला मजूरही कामासाठी आला तर त्या कारणाने त्याला काम नाकारु नये.

परन्तू कामाच्या जागेवर असणाऱ्या अधिकाऱ्याने त्याच्याकडून अर्जावर सही अंगठा घेऊन त्याचे नांव नोंदवून घ्यावे त्यावर त्याला ओळख पत्र दिले जावे.

(नियोजन विभाग सर्क्युलर 1082/CR/114/D–37
29th Nov. 1982)

## ३] मजूरीचे प्रश्न :

१) रोजगार हमी योजनेवर कामावर लागणारी हत्यारे व अवजारे शासनाने विनामुल्य पुरवायची आहेत. मजुरांनी आपली स्वत:चीच अवजारे वापरल्यास त्याचे भाडे प्रती अवजार १० पैसे, धार लावण्यासाठी प्रती हत्यार प्रती व्यक्ती २५ पैसे व पाण्याचे भांडे ( हंडा, बादली इ. ) स्वत:चे आणल्यास त्याचे १० पैसे वेगळे दिले पाहिजेत.

( संदर्भ–शा.नि.वि.क्र. ईजीएस १०८१/२७८/डी–३३ दि. २६–३–८१)

२) विशिष्ट भागातील भूस्तरामुळे किंवा एखाद्या बाबीसंबंधाच्या दराचा रोजगार हमीच्या दर पत्रकांत समावेश नसल्यामुळे ७ तास काम केल्यानंतरही ४ रुपये–आता ६ रुपये मजूरी पडत नसल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अंमलबजाणी अधिकाऱ्याने जिल्हाधिकाऱ्याने या सल्ल्याने व विभागीय आयुक्ताच्या सल्ल्याने तात्पुरते दर पुनरिक्षित–revise करावे असे आदेश शासनाने दिले आहेत.

खडी फोडण्याच्या संदर्भात हा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यात त्या कामाची सवय नसल्याचाही प्रश्न होता.

( नियोजन विभाग–शासन निर्णय (जी.आर.) क्र. ईजीएस. १६८१/कार्या. ३७
दि. २८ जानेवारी १९८१)

## ३] कामाच्या जागी दर फलक :

कामाच्या जागी मजूरीचे दर, लिड व लिफ्टचे दर मराठीत एका फलकावर लिहून सर्वांना दिसेल अशा जागी तो फलक लावाला पाहिजे.

(नियोजन विभाग क्र. ईजीएस. १०७५ ईएमपी. ईजीएस. २९ नोव्हेंबर १९७५)

## ४] मजूरीचे वाटप :

—मजुरींचे वाटप दर आठवड्याला, बाजाराच्या आदल्या दिवशी झाले पाहिजे. कसल्याही परिस्थितीत हे वाटप १५ दिवसांत झालेच पाहिजे.

—हे वाटप कामाच्या दिवशी व कामाच्या जागीच झाले पाहिजे.

—हे वाटप अंधार पडण्यापूर्वी झाले पाहिजें. स्त्री मजुरांना ५ ..बून यणाऱ्या मजुरांना अगोदर वाटप करावे.

—मजुरीत अवजार भाडे, धार लावणे इत्यादीचा समावेश केला पाहिज व तसे समजावून सांगितले पाहिजे.

—जेथे आठवड्याच्या शेवटी पूर्ण हिशोब देणे काही कारणाने शक्य नसेल तेथे कामाप्रित्यर्थ, द्यावयाच्या मजुरीची ४० टक्के रक्कम अँडव्हान्स म्हणून दिली पाहिजे.

—मजुरीची किमान किंवा कमाल मर्यादा नाही.

(संदर्भ–२० नोव्हेंबर ७५, १३ डिसेंबर ७५, ३० जुलै ८०, २९ जानेवारी ८० व ६ एप्रील ७९ चे नि. वि. चे आदेश)

## ४] कामाचा आणेवारीशी संबंध नाही :

पन्नास किंवा अधिक लोकांनी कामासाठी अर्ज केल्यास त्यांना काम दिले पाहिजे. परन्तू त्या अगोदर खालील गोष्टी पाहणे आवश्यक आहे. शेतीच्या गरजा, योजनांच्या किंवा रो. ह. यो. तहत घेतलेल्या कामाच्या गरजा, अपुऱ्या कामांच्या गरजा. या ठिकाणी पुरेसे मजूर उपलब्ध आहेत हे पहावे. परन्तू तालुक्यात पीकाची आणेवारी काय आहे याबद्दल रो. ह. यो. तहत काम देतांना विचार करण्याची गरज नाही

(२० सप्टेंबर ७४ व १४ फेब्रुवारी ७५ चे जी.आर. व १२ मार्च ७६ ईजीएस १०७६ तहत सूचना)

## ५] ६० : ४० खर्चाची अट शिथिल करण्यासंबंधी :

रो ह. यो. च्या तहत जे फंड उपलब्ध आहेत त्याचा वापर करतांना एक मुख्य अट अशी आहे की कोणतेही काम सुरु करतांना त्याचा ६० टक्के खर्च फक्त अकुशल मजुरांच्या पगारात खर्च होईल हे पाहिले पाहिजे. कुशल कामगार मिस्त्री यंत्रसामुग्री व इतर सामान याचा खर्च ४० टक्क्यामध्ये बसला पाहिजे. एकेका कामाला हा नियम लागू केला तर कामेही कमी निघतात व ती अपुरी राहतात. आजच्या घटकेला (जुलै १९८२) एकंदर मंजूर केलेल्या १,१७,६०० कामापैकी ४५००० कामें अपूर्ण आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासन असा निर्णय घेते की (i) प्रत्येक एजन्सीने आपल्या वर्षभराच्या एकंदर खर्चात ६० टक्के खर्च अकुशल कामगारांच्या मजूरीसाठी केला असेल तर ही अट पूर्ण झाली असे समजले जाईल.

२) हे समोर ठऊन अपूरी कामे पूर्ण करणे सुलभ होईल.
( शासकीय ठराव ईजीएस १०८२/८०/डेस्क ३३/४ जुलै १९८२ ]
,, ,, ,, १०८२/३०/डी-५८/१५ जुलै १९८२ )

अपूरी कामे पूर्ण करुन घेण्यासाठी याचा उपयोग होईल. काम मिळेल व उत्पादक कामेही पूर्ण होतील.

## ६] शेतकऱ्यांना मोबदला

रो. ह. यो. च्या तहत रस्ते, पाझर तलाव इत्यादीसाठी घेतलेल्या शेत-कऱ्यांच्या जमीनीचा मोबदला रो. ह. यो. च्या फंडातून करणे नियमबाहृय आहे. त्याचबरोबर हेही खरे आहे कीं अशा जमीनीचा मोबदला अनेक वर्षे दिला जात नाही. त्यामुळे शेतकरी उत्पादक कामासाठी आपली जमीन देण्यास तयार होत नाही. तेव्हा मजूरांना उत्पादक कामे देणे कठीण होते, अनुत्पादक कामे घेतली जातात. तेव्हा कामाचा आराखडा तयार करतांनाच त्यात संबंधित खात्याने आपल्या फंडातून मावजा देण्याची तरतुद केली आहे हे पाहण्याची जबाबदारी कलेक्टरची आहे.

( शासन ठराव ईजीएस १०७५/२९ नोव्हेंबर १९७५)

शासनाने अलीकडे रो. ह. यो. च्या फंडातून मावेजा देण्याची परवानगी दिल्याची चर्चा आहे तसे झाल्यास नव्या कामांना पैसा कमी पडेल तरी त्या दृष्टीने शासनाचा पूर्वीचा हा ठराव महत्वाचा आहे.

## रोजगार हमी योजनेतंर्गत कोणती कामे घेता येतात ?

रो. ह. यो. अंतर्गत कोणती कामे घेता येतील हा विषय गेली १०-१२ वर्षे सतत चर्चेचा विषय राहिला आहे आणि या संबंधीचे शासनाचे धोरण विळोवेळी बदलत राहीले आहे. ग्रामीण श्रमशक्तीचा उपयोग उत्पादक कामासाठी व्हावा, त्यातल्या त्यात दुष्काळ निवारणासाठी, जलसिंचनासाठी व शेतीच्या विकासासाठी व्हावा याबद्दल सर्वांचे एकमत आहे. परन्तु अनेकदा परिस्थितीचा रेटा एवढा वाढतो की कोणतेही काम द्या पण कामाला लावा हीच मागणी पुढे येते, आज अशीच कांही परिस्थिती निर्माण झाली आहे व कामे कमी पडत आहेत या उलट केवळ उत्पादक कामेच घ्यायची, त्यासाठी मजूरांना जिल्हृयात कुठेही जावे लागले तर बेहत्तर परन्तु अनुत्पादक कामे घेऊ नका असा शासनाचा नविन धोरणांचा खाक्या राहीला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कामाची गरज आणि उपलब्ध काम यात अंतर कमालीचे वाढत आहे. अशास्थितीत रो. ह. यो. संबंधी सरकारी कायदा, नियम व ठराव याचा आधार घेऊन काम मागणे क्रम प्राप्त आहे. केवळ उत्पादक कामाचाच विचार केला तरी पूर्वीच्या नियमांचा व ठरावांचा आधार घेऊन अनेंक अशी उत्पादक कामे सूचविणे शक्य आहे जो गांवाजवळ आहेत. त्याची संक्षिप्त माहितीखाली दिली आहे.

## ९] शेती क्षेत्राच्या व्यतिरिक्त उत्पादक कामे :

रो. ह. कायद्यात अगदी सुरवातीसच कायदा आणण्याचे प्रयोजन म्हणून चार कारणे दिलेली आहेत.

१) घटनेच्या तहत सर्वांना कामाचा हक्क.

२) ग्रामीण भागातील वरकड श्रमशक्तीला सातत्याने रोजगार पुरविण्याची गरज

३) कायम स्वरुपाने assets निर्माण करणारे काम.

४) कुटीर उद्योग, ग्रामीण व लहान उद्योग, शेतीवर आधारित उद्योग

२) यापैकी चौथे कलम उत्पादक कामाचे नवे व व्यापक दालन उघडते. खालील जी.आर. त्यादिशेनें एक पाऊल आहे.

(शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. एल.आर.डब्ल्यु. ११७५/१३ ३५१–६ दिनांक ११ मार्च १९७१, शासन निर्णय क्रमांक रो. ह. यो. १०७५/ई.एम.जी. ७ जुलै १९७५)

रो ह, यो खाली समाविष्ट करण्यांत आलेल्या 'क' वर्गातील न. पा. च्या क्षत्रांत राहणाऱ्या कामगारांच्या फायद्यासाठी शासन असा निर्देश देत आहे की 'क' वर्गातील नगर पालिकेच्या क्षेत्रात रो. ह. यो खाली खालील प्रकारची कामे सुरु करण्यात यावी

अ) पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनांतील अकुशल कामाचा भाग.

ब) गांव तळयातील गाळ काढणें, त्याचा उपयोग करुन बीटा कौलारुचे उत्पादन. रत्नागिरी कोलाबा येथें दगड कटाईचें काम व यातून गरीबांसाठी घर बांधणी

क) शेतजमीनीचे सपाटीकरण ईत्यादी.

३) रो. ह. यो. समितीच्या आठव्या अहवालात कामे संपत आलीत तेव्हां त्याची व्याप्ती वाढवा असे सुचविल्यावर शासनातर्फे सांगण्यात आले की प्रत्येक जिल्हयात १० भूमिगत बांधारे, कांही ठिकाणी तुतीच्या झाडांची लागवड तर कांही ठिकाणी फल झाडांची लागवड इत्यादी कामे काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

iv) ग्रामविकासाची कामे :

(संदर्भ–सरकारी ठराव-रो. ह. यो. १०८/६५ डेस्क ३१ दिनांक १ डिसें. ८१ )

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रमामार्फत महाराष्ट्र शासनास कांही रक्कम मिळत असते. राज्यशासन रो ह. यो. फंडातून तेवढीच रक्कम टाकणार. या फंडातून ग्रामसभा खालील कामे घेऊ शकते.

१) वनसंवर्धन, सामाजिक वनीकरण, रस्त्याच्या अगर पाटाच्या दुतर्फी झाडे लावणे, औसाड जंगल विभागात झाडे लावणे.

२) पिण्याच्या पाण्यासाठी विहीर खोदणे, दलित समाजासाठी घरे बांधणें.

३) गावतळी बांधणे, दुरुस्त करणे.
४) खेड्यातील अंतर्गत रस्ते, गटारे, खतांचे खड्डे इत्यादी तयार करणं.
५) खुले थिएटर अगर क्रीडांगण तयार करणे.
६) शाळा, बालवाडी यांच्या इमारती, पंचायत घर, सांस्कृतिक इमारत (केन्द्राची) छोटया औद्योगिक वसाहती, सार्वजनिक संडास, स्नान गृहे, स्मशानभूमी इत्यादी ही कामे पार पाडण्यासाठी तपशीलवार कार्यपद्धती आंखून दिली आहे.

## शेती क्षेत्रात उत्पादक कामे :

रो. ह. यो.अंतर्गत कोणती उत्पादक कामे काढावीत हा प्रश्न गेली काही वर्षे सतत चर्चेचा विषय बनलेला आहे. त्या संबंधी सत्य पातळीवर सतत पाठ पुरावा केल्यानंतर COWDEP काऊडेप एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास या नांवाने एक सर्वकष शेतीसूधार. विकास, सिंचन योजना समोर आली आहे. त्या विषयी रो. ह. यो. समितीने वेळोवेळी केलेल्या शिफारशी व शासनाची उत्तरे उद्‌बोधक आहेत व आजच्या परिस्थितीत उत्पादक कामे मिळविण्यासाठी अत्यंत महत्वाची आहेत. ही प्रश्नोत्तरे जशीच्या तशी दिली आहेत.

" **समितीची शिफारस** — ऑक्टोबर १९७५ मध्ये झालेल्या बैठकीत नियोजन खात्यातर्फे पाणलोट क्षेत्र विकासाचे काम रो. ह. यो. खाली घेतल्यास ३, ४, ५ मैलाच्या परिसरातील लोकांना भरपुर काम मिळू शकेल. ते सुमारे ६ ते ७ वर्षे पुरेल असेही सांगण्यांत आले होते. परन्तु या योजनेस अजून मूर्त स्वरुप आलेलें नाही. या बाबतीत समितीची अशी सिफारस आहे की, पाणलोट क्षेत्र विकास योजनेस अंतीम स्वरुप देण्याच्या दृष्टीने त्वरीत कारवाई करावी "

## शासनाने केलेली कारवाई :

" समितीच्या शिफारशीची पूर्तता पाणवहाळ क्षेत्रावर आधारित भुविकासाच्या कार्यक्रमाबाबतच्या ८ सप्टेंबर १९८१ च्या आदेशान्वये करण्यात आली आहे."

## समितीने मागविलेली अधिक माहिती—

" (१) प्रत्येक ब्लॉकमध्ये किती पाणलोट क्षेत्रे निवडण्यांत आली आहेत ? किमान ५ किलो मीटरच्या आतमध्ये मजुरांना काम उपलब्ध होईल अशा पद्धतीने पाणलोट क्षेत्र निवडण्यात येणार आहे का ? (२) पाणलोट क्षेत्राचा सर्वे करण्यासाठी स्टाफ वाढवून देण्याबाबत शासनाने काही कार्यवाही केलेली आहे का ? (३) प्रत्येक ब्लॉकमध्ये किमान २०—२० पाणलोट क्षेत्र निश्चित केल्याशिवाय नालाबंडिंग कामे न घेण्याविषयी काढलेल्या आदेशाची अंमलबजावणी करु नये असे समितीचे मत आहे.................."

## शासनाने दिलेली अधिक माहिती–

" पाणवहाळ क्षेत्र कार्यक्रमांतर्गत निवडण्यात आलेल्या पाणलोट क्षत्राची व इतर माहिती कृषि व सहकार विभागाकडून मागविण्यात आलेली आलेली आहे. "

समितीने या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यासाठी अजून कांही शिफारसी केल्या. उदाहरणार्थ :

रो. हृ. यो. समितीने १९८३ च्या उत्तरार्धात असे सुचविले कीं,

" उत्पादक कामाची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने पुढील कामाचे योजनेत समावेश करता येईल काय ह्याचा विचार शासनाने करावा.

१) आदिवासी भागातील लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून त्या भागांत २० वर्षाच्या कराराने फळबागा लावून घ्याव्यात व जमीनधारकांकडून कर्जाची वसुली ३ ते ५ वर्षांनंतर सुरु करावी.
२) पाझर तलावाच्या लाभ क्षेत्रात विहिरी बांधावयाची कामे.
३) कमाल जमीनधारक अधिनियमान्वय अतिरिक्त असलेली पण लागवडीस योग्य नसलेली सर्व जमीन लागवडी योग्य करण्याचे काम.
४) शेततळी.
५) लाभक्षेत्राबाहेरील जमिनीचे लेवलिंग करणे.
६) भूमिगत नाला बांधबंदिस्तीची कामे.
७) धरणाच्या लाभक्षेत्रातील उथळ जमिनीचे सर्वेक्षण करुन त्या जमिनीचा विकास करण्याचे काम "

## या संबंधी शासनानें खालीलप्रमाणे त्रोटक उत्तर दिले

" पाणवहाळ क्षेत्रावर आधारित भूविकासाच्या कार्यक्रमाबाबत शासन निर्णय दि. ८ सप्टेंबर १९८१ अन्वये शिफारशीची पूर्तता होते. "

–रो. हृ. यो. समिती आठवा अहवाल १९८३–८४ पा. १२–१३

नववा अहवालात (१० एप्रील १९८४) याच गोष्टीचा पाठपुरावा करीत रो. हृ. यो. समितीने म्हटले की,

" सद्या राबवित असलेली कामे जवळजवळ संपत आलेली आहेत. नगर जिल्ह्यामध्ये मृद संधारण्याच्या साईटस संपल्या आहेत. इतर जिल्ह्यामध्ये जी कामे हाती घेतलेली आहेत. ती पूर्ण होत आलेली आहेत. मजुरांकडून मात्र कामाची वाढत्या प्रमाणात मागणी होत असते " हे म्हणून व मागे दिलेल्या कामाची यादी पुन: सादर करीत व त्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीत विहिरी खणणे, पाझर तलावात मत्स्योत्पादन व त्यांच्या काठावर फूलझाडे, अंबर चरखा इ. कामाची भर टाकीत समितीनें सांगितले. ——

" राज्यातील अल्पभूधारकांची आर्थिक उन्नती होण्यासाठी वरील कार्यक्रम आखण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा उद्देश पाणवहाळ क्षेत्राचा एकात्मिक व सर्वंकष विकास करण्याचा असून त्याची आखणी करताना पाणवहाळ क्षेत्र अथवा प्रवाह, तलाव, जलविहीर यांच्या परिसरात येणाऱ्या जमीनीच्या विकासावर आधारित प्रकल्प आखणे. या कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकाऱ्यानी विभागीय मृदसंधारण अधिकाऱ्यांच्या सहाय्याने जिल्हावार प्रकल्प अहवाल १९८३ अखेर तयार ठेवायचे होते... समितीने याबाबत जिल्हावार माहिती घेतली. त्यात असे आढळले की आदेशाप्रमाणे कांही जिल्ह्यामध्ये प्रकल्प अहवाल तयार नाहीत. सर्वे करणारा कर्मचारी वर्ग अपुरा आहे. कांही जिल्ह्यांतील अधिकारी या योजनेबाबत जितकी आपुलकी दाखविली पाहिजे......ती दाखवत नाहीत......त्या दृष्टीने कृषि खात्याला हा कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असणारा अधिक कर्मचारी वर्ग (स्टाफ) त्वरित उपलब्ध करुन द्यावा अशी समिती शिफारस करीत आहे "

–रो ह. यो समिती नववा अहवाल पा. ८–९

शेवटी दहाव्या अहवालात (६ नोव्हेंबर १९८४) शासनाने सांगितले की, " महाराष्ट्रात कोरडवाहु जमिनीत सर्वसाधारण सपाटी करण्याची कामे १९७९–८२ च्या कालावधीत शासन निर्णय क्रमांक मृदसं–१०७८/३८३६७ (५६४) / १६–अे दि. २४ जुलै १९७९ अन्वये घेण्यात आला व आता कोरडवाहु क्षेत्रात ज्या ठिकाणी कंटूर व ग्रेडेड बंडींगची कामे झाली आहेत त्या ठिकाणी नियोजन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक ईजीएस १०८१/७/३७ दि. ६ मार्च १९८१ अन्वये ही कामे घेण्याची परवानगी दिली आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रात ही कामे सर्वत्र चालू आहेत. यापुढे मृदसंधारणेची सर्व कामे पाणलोट तत्वावर ( काऊडेप ) करावयाची आहेत (कृषि विभागाचा दि. २७–७–१९८३ चा निर्णय) या कार्यक्रमामध्ये लँन्ड शेपिंग व ग्रेडिंग कामाला महत्वा स्थान आहे. "

—रो ह यो. समितीचा दहावा अहवाल ४ नोव्हेंबर १९८४ पा ६

पाऊसाचे पाणी अजिबात वाया जाऊ देता कामा नये. त्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवायला पाहिजे म्हणून बंडींग व सपाटीकरणाच्या योजनांचे पुढचे पाऊल म्हणून एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास योजना पुढे आली आहे. या योजनेचा दुहेरी फायदा आहे ह्या योजनेमुळे सतत कमी कमी होत जाणाऱ्या पर्जन्याचा जास्तीत जास्त उपयोग घेता येईल व दुसरे ही योजना प्रत्येक शेताशेतात एकंदर भूमिलाच नवा आकार देणारी असल्यामुळे मजुरांना गांवापासून लांब जावे लागणार नाही. आणि तरीही अवर्षणाच्या व कामाच्या वाढत्या मागणीच्या या दशकात ही योजना मूर्त स्वरुपात येण्यासाठी नऊ वर्षे लागली ! ती राबवन घेण्यासाठी सुद्धा मोठे प्रयत्न करावे लागतील.

## आदिवासींच्यासाठी विशेष योजना–

१) शासनाने २० सप्टेंबर १९७४ चा ठराव व नंतर त्याचा पाठपुरावा करणारे

१४ एप्रिल १९७५ चे पत्र पाठवून आदिवासी भागात रो. ह यो. राबवित असतांना त्या भागातील मागास अर्थव्यवस्था व काम मिळण्याची कमी शक्यता लक्षात घेऊन कामे काढल्याबद्दल अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश दिले. इतर भागात रस्त्यांची कामे सुरु करण्याबद्दल जी बंधने आहेत (३३ टक्केपेक्षा अधिक खर्च होऊ नये ई. ) ती या भागापुरते शिथिल करण्यास सांगितले व त्याच बरोबर रो ह. यो. च्या तहत कोणती उत्पादक कामे घेता येतील त्याचा शोध घ्यावा असे आदेश दिले. त्यानुसार वेळोवेळी कामे सुचविली गेली आहेत. उदाहरणार्थ–

१) शासनाने आदिवासींना जंगल जमीनी दिल्या असल्यास त्या जमिनीवरील झाडे तोडणे, खुंट काढणे, बंडिंग व लेवलिंग करणे शासकीय बांध घालणे.
ठराव २४ मे १९७६ २१ मे १९७६ व ३१ मे १९७८, १ एप्रिल १९८२

२) भात शेतीतील खुंट नांगरुन टाकणे, रोग पडला असल्यास ते जाळून टाकणे.
दि. २१ एप्रील १९७८

३) शासकीय आदिवासी सबप्लानमधून घेतलेल्या खावटी कर्जाची परत फेड रो. ह. यो. च्या कामातून करण्याची आदिवासींना मुभा.
शा. प. नि. वि. क. इजीएस १०७७।२२।५ व ६ ऑक्टोबर १९७८

## रोजगार हमी योजना–एक आढावा–

रोजगार हमी योजनेचा प्रारंभ होऊन दिड दशक पूर्ण होत आहे. या योजनेची सुरुवात आशादायक होती. ग्रामीण भागातील श्रमिकांना त्याचा एक मोठा आधार वाटला. जे दिवस बकारीत व उपासमारीत जात होते त्यापैकी कांही दिवस तरी बरे जाऊ लागले. कामे मिळाली, कांही प्राप्ती झाली, विशेषत: ग्रामीण मजूर बायांना या योजनेनें एका मोठा दिलासा दिला. पुरुषांच्या बरोबरीने काम व दाम स्वत:च्या पायावर उभे राहण्याची शक्ती या योजनेने दिली. दुसऱ्या बाजूला या योजनेने ग्रामीण भागात विकासाला मोठी चालना दिली. रस्त्याचे जाळे निर्माण झाले. पाझर तलाव, नाला बंडिग व शेतांचें बंडींग, गांवतळी, वृक्षारोपण इ. उपयोगी कामाचा डोंगर मानवी श्रमातून उभा राहिला या योजनेच्या तहत १९७२-७३ ते १९८२–८३ च्या दशकात एकुण १,१४,३४१ लहान मोठी कामे घेण्यात आली व त्यापैकी ७१,५८४ कामे पूर्ण करण्यात आली. यात सर्वांत जास्त कामे बंडिग व नाला बंडिगची होती. त्यामुळें १ लाख एकर जमिनीची उत्पादन क्षमता दुपटीने वाढली असे तज्ञाचे मत आहे. ७७१३ पाझर तलावाचे काम पूर्ण झाले. त्यामुळे २५ ते ३० हजार विहीरींच्या पाण्याची पातळी वाढली व सुमारे २५००० नव्या विहीरी खोदण्याची क्षमता निर्माण झाली १३,०११ कच्चे रस्ते तयार झाले.

या काळात १९७२–७३ ते १९८२–८३) एकंदर रु. ७१५.४३ कोटी खर्च पडले आणि तरी रो. ह. यो साठी जो कर बसविला जातो त्याच्या प्राप्तीतून रु.४४.०२ कोटी शिल्लक राहिले.

वरील दहा वर्षांच्या काळात या योजनेंखाली एकूण १२४.५४ कोटी मनुष्य दिवस एवढे काम करण्यात आले. याचा अर्थ वर्षाला सरासरी १२॥ कोटी मनुष्य दिवस रोजगार अर्थात १२॥ लक्ष लोकांना वर्षाकाठी १०० दिवस काम मिळाले. अर्थात ही सरासरी आहे. प्रत्यक्षात किती लोकांना रोजगार हवा होता, पैकी किती लोक कामावर आले व त्यांना किती दिवस काम मिळाले हे जास्त तपशीलात गल्या- नंतरच समजू शकेल. महत्वाचे हे की ही योजना येण्यापूर्वी इतकी श्रमशक्ती इतके हात बेकार होते त्यांना काम मिळाले, इतकी उत्पादक कामे घेता आली.

परन्तु योजनेच्या प्रगतीबरोबर कांही प्रश्नही निर्माण झाले. उत्पादक कामाच्या व्याख्येत बसतील अशी कोणती कामे दरवर्षी वाढत्या संख्येने कामावर येणाऱ्या मजु- रांना द्यावी, त्यासाठी आवश्यक तांत्रिक कर्मचारी वर्ग कसा उपलब्ध करुन द्यावा. उत्पादक कामासाठी ज्या जमिनी घ्यावा लागतात त्याचा मावजा कसा द्यावा, जी कामे पूर्ण झाली त्याची नेहमीची देखरेख करण्याची जबाबदारी कोणी घ्यावी शेकडो कोटी रुपयाच्या ह्या अवाढव्य कामाच्या व्यापाला भ्रष्टाचाराने ग्रासले. त्याला कसे तोंड द्यावे हे व असे कांही महत्वाचे प्रश्न शासन यंत्रणेसमोर उभे राहिले. त्यातच ग्रामीण भागातील श्रीमंत शेतकरी वर्गाला ही योजना सलु लागली. मजूर वर्गाला पर्यायी काम मिळु लागल्याने त्यांची लाचारी, गांवातील बड्या लोकांनी काम दिले तर काम नाहीतर उपाशी ही अवस्था संपु लागली. ते थोडे स्वतंत्रपणे स्वाभिमानाने जगु लागले. पूर्वीसारखे मिळेल त्या मजूरीत समाधान मानण्याची त्यांची वृत्ती बदलु लागली व परिणामी या श्रीमंत व राजकीय दृष्टया वजनदार वर्गाने या योजनेविरुद्ध ओरड सुरु केली की त्यामुळे शेतीला मजुर मिळत नाहीत, ते डोक्यावर चढलें आहेत, ई या सर्वांचा एकंदर परिणाम म्हणून योजनेंसंबंधीच्या शासकीय दृष्टिकोनात हळूहळू बदल होऊ लागला, तीचा हात आखडता होऊ लागला फार ओरड केली तरच काम असे चित्र दिसु लागलें. पूर्वी शासकीय अधिकारी लोकांनी एकत्रपणे येऊन काम मागितले तर काम देत. आता ते काम न देण्यासाठी तांत्रिक गोष्टी पुढे करु लागले. नोंदणी पाहिजे, कामाचा अर्ज पाहिजे व काम दिलेच तर गावापासुन जिल्ह्यात कुठे तरी दूर देऊ लागले. याचा परिणाम असा झाला की ज्या महाराष्ट्रात १९७२-७३ च्या दुष्काळात चाळीस लक्ष लोकांना काम होते त्याच महाराष्ट्रात आजच्या दुष्काळात मंत्रीमंडळाच्या औरंगाबादच्या बैठकीपर्यंत (ऑक्टो. ८६) साडेतीन लक्ष लोकांनाच काम होते व रोजगार हमी योजनेखाली नांव नोंदविणारे, काम मागणारे व ज्यांना काम उपलब्ध केले जाते यांच्या संख्येत कांही मेळच राहिला नाही, हे खालील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

## रोजगार हमी योजनेखाली श्रमिकांची नोंदणी-

| अ.क्र. | जिल्हा | १ ऑक्टोबर ८१ | १५ ऑक्टोबर ८६ |
|---|---|---|---|
| १) | ठाणे | १९१,७३२ | — |

| अ.क्र. | जिल्हा | १ ऑक्टोबर ८१ | | १५ ऑक्टोबर ८६ |
|---|---|---|---|---|
| २) | रायगड | ४४,७८२ | | — |
| ३) | रत्नागिरी | ४८,६६७ | | — |
| ४) | सिंधुदुर्ग | १९,७०० | | — |
| ५) | नाशिक | २७३,८१८ | | — |
| ६) | धुळे | २०९,७४२ | | — |
| ७) | जळगांव | ११०,८८२ | | — |
| ८) | पुणे | १२७,९९१ | | — |
| ९) | अहमदनगर | ३१२,२६७ | | — |
| १०) | सातारा | ६५,८१६ | | — |
| ११) | सांगली | ५०,६५५ | | — |
| १२) | सोलापूर | २२६,३११ | | — |
| १३) | कोल्हापूर | ३६,६०२ | | — |
| १४) | औरंगाबाद | १४१,८४२ | | २३५,८०१ |
| १५) | जालना | ८९,११२ | | १२१,१९० |
| १६) | परभणी | १३५,२२७ | | २१४,३१३ |
| १७) | बीड | २००,२९० | | २७८,९७६ |
| १८) | नांदेड | १८५,२४० | | ३२९,४५६ |
| १९) | उस्मानाबाद | २७८,६८० | १०,३०,३३१ | १०५,५५३ |
| २०) | लातूर | | | १८१,५३८ |
| २१) | बुलढाणा | १०९,०१० | | १४,६६,८३१ |
| २२) | आकोला | १९३,३६७ | | — |
| २३) | अमरावती | १८०,५६२ | | — |
| २४) | यवतमाळ | १६३,५६७ | | — |
| २५) | वर्धा | ७१,१८२ | | — |
| २६) | नागपूर | १३१,०३३ | | — |
| २७) | भंडारा | ४८१,२३७ | | — |
| २८) | चंद्रपुर | ३३४,११२ | | — |
| | | एकुण ४४,३१,४२६ | | |

साऱ्या महाराष्ट्रातून रो. ह. यो. खाली स्वत: नोंदवून घेणाऱ्या मजुरांची संख्या १ ऑक्टोबर १९८१ रोजी ४४.३ लक्ष होती. त्याच तारखेला मराठवाड्यातून नोंदविलेल्या मजुरांची संख्या १०.३ लक्ष होती. तीच संख्या १५ ऑक्टोबर ८६ रोजी १४.६ लक्ष झाली. त्याच प्रमाणात उर्वरित महाराष्ट्रात मजुरांची संख्या वाढली असे गृहित धरल्यास आज ती ६२ लक्षाच्या आसपास असली पाहिजे. एका बाजुला ही संख्या तर दुसऱ्या बाजुला ८४ ते ८६ ह्या अवर्षणाच्या तीन वर्षात महाराष्ट्रात

रो ह. यो. वर काम करणाऱ्या मजुरांची ६ ते ८ लक्षापर्यंत घोटाळणारी संख्या याचा काही केल्या मेळ बसत नाही. ह्या आकडेवारीत मस्टर तयार करण्यात होणाऱ्या भ्रष्टाचाराचा हिशेब केलेला नाही. तो केला तर चित्र अजूनच भयानक दिसते. धुळ्याचे भ्रष्टाचाराचे प्रकरण सुप्रसिद्ध आहे. त्या कर्तबगार जिल्हाधिकाऱ्याने धुळे जिल्ह्यातील एकुण ४४४९२ मस्टर (वेतन पत्रके) पकी फक्त ४० कामावरील ३१५ मस्टर्स तपासली तेव्हां हे निदर्शनास आले की मजुरी म्हणून वाटण्यात आलेल्या रकमेपैकी साठ टक्के रक्कम ८६ लक्ष रुपये अधिकाऱ्यांनी गिळंकृत केली होती ! अर्थात एवढ्या मोठ्या प्रमाणावर मजुरांची बोगस नांवे व हाजरी टाकली होती !

गेल्या कांही वर्षात शासनाची पाऊले मजुरांना काम मिळणे अधिकाधिक दुरापास्त व्हावे या दिशेने पडत गेली असे सांगण्यास बराच आधार आहे नोंदणी करणे पूर्वीही आवश्यक होते पण कोणाला तेवढ्याच कारणाने काम नाकारले जात नव्हते. आता नोंदणीचा आग्रह धरला जाऊ लागला आहे. पूर्वी काम मागण्यासाठी साधा सामुहिक अर्ज पुरत असे. आता प्रत्येकाने ठरलेल्या नमुन्यात अर्ज केला पाहिजे असा आग्रह धरला जात आहे. पूर्वी गांवाजवळ किंवा पंचायत समितीच्या क्षेत्रात काम दिले जात असे. आता १००–१५० किलो मिटरच्या अंतरावरची कामे दाखविली जात आहेत, (उदा. जि. नगरमध्ये श्रीरामपुर व नेवासाच्या मजुरांना कुकडी धरणाचा कामावर जाण्याचे आदेश) यात मोठ्या योजना पूर्ण करण्याचा उद्देश आहे असे गृहित धरलें तर तशा प्रकारचे कामाचे नियोजन इतर जिल्ह्यांत दिसत नाही. बकार भत्याचा हक्क प्राप्त व्हावा म्हणून या तांत्रिक गोष्टीवर (नोंदणी–कामासाठी अर्ज ई) भर दिला जात आहे असे म्हटले तर योजना सुरु झाल्यापासून आताच्या क्षणा–पर्यंत किती मजुरांना असा भत्ता मिळाला अशी विचारणा केली तर गेल्या १२ वर्षात बेकार भत्ता दिल्याची प्रकरणें एका हाताच्या बोटावर मोजण्या इतकीही निघणार नाहीत !

खरी गोष्ट अशी आहे की प्रशासनाचा ह्या योजनेकड पाहण्याचा दृष्टीकोनच बदलला आहे. योजनेच्या सुरुवातीच्या काळात शासनाने एक ठराव करुन म्हटले होते की, "आपल्या राष्ट्रीय जीवनात शेतीला मोठे स्थान आहे. शेतीचे हे महत्वपुर्ण स्थान लक्षात घेता शेती उत्पादनास हानिकारक होईल अशा तऱ्हेने रो. ह. यो. राबविली जाऊ नये अशी शासनाचीं उत्कट इच्छा आहे परन्तु ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूर व अल्प भूधारक तसेच बेरोजगार लोक यांची अवाढव्य संख्या लक्षात घेता रो. ह यो. मुळे शेतीच्या कामास झळ पोहोचेल अथवा शेत उत्पादनात खंड पडेल अशी शासनाला मुळीच भीती वाटत नाही म्हणून किमान शेतमजुरीचे तत्व व कामाच्या हमीचे तत्व यापैकी कोणत्याही तत्वाचा भंग होणार नाही याची जिल्हा–धिकाऱ्याने (कलेक्टर) दक्षता घेतली पाहिजे आणि प्रत्यक्षात कायद्याने ठरविल्या–प्रमाणे शेतमजुराला किमान शेतमजुरी मिळेल, बेरोजगार मजुराला कामाची हमी मिळेल अशारीतीने या योजनेची कार्यवाही केली पाहिजे. ज्यांना कामाची गरज आहे त्यांना संपूर्ण वेळ काम मिळवून देणे आणि ज्यांना शेतावर काम मिळत आहे त्यांना

किमान शेतमजुरी मिळवून देणें अशी दुहेरी जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची आहे. "

( शासकीय प्रस्ताव (जी.आर.) नियोजन विभाग क्रमांक इजीएस १०७५–पा.४ दि. १४ फेब्रुवारी १९७५ )

तेच शासन आज वेगळी भूमिका घेते. उदाहरणार्थ रो. ह. यो. समितीच्या आठव्या अहवालात (२३ नोव्हेंबर १९८३) समितीच्या खालील सूचना व त्याला शासनाने दिलेलें उत्तर आहे.

## समितीची शिफारस–

" रो. ह. यो. खाली करावयाच्या कामांची दोन गटांमध्ये विभागणी करावी. ज्या श्रमिकांना बाराही महिने कामाची गरज आहे अशांचा एक गट व इतरांचा दुसरा. पहिल्या गटांतील श्रमिकांना मोठ्या प्रकल्पावर कामावर ( उदा. कालव्याची कामे ई. ) रोजगार देण्याची व्यवस्था करावी.......दुसऱ्या गटातील श्रमिकांना कामाचा कालावधी लक्षात घेऊन काम उपलब्ध करुन द्यावे. वर म्हटल्याप्रमाणे श्रमिक आपल्या राहत्या गांवापासून दूर अंतरावर काम करण्यास नाखूष असतो. या दृष्टीने विचार करुन गावाच्या जवळ रो. ह. यो. खाली कामे काढणे शक्य झाले तर मोठ्या संख्येने श्रमिक उपलब्ध होऊ शकतील. त्याकरिता गावाची सर्वांगिण विकास योजना तयार करण्यात यावी त्यामध्ये पाटबंधारे, वॉटर शेडच्या विकासाची कामे, कोरडवाहू जमिनीचे शेपींग व लेव्हलिंग, रस्ते वगैरे कामाचा समावेश असावा. "

समितीच्या ह्या अत्यंत योग्य सूचनेची शासनानें कशी वासलात लावली ती पाहण्याजोगी आहे. शासन म्हणते :

" रो ह. यो. राबविण्याची शासन मागची भूमिका मुख्य भूमिका अशी की, ज्यावेळेस ग्रामीण विभागात शेतीने कामे अथवा अन्य योजनाखाली शासनानें घेतलेली कामे उपलब्ध नसतील तेव्हा जर अशा लोकांना काम हवे असेल तर रो. ह. यो. खाली कामे घेण्यात यावीत. याचा अर्थ असा की ज्याला काम हवे असेल त्यांनीं पहिल्यांदा शेती काम अगर अन्य शासकीय कामे यांवर सोय लावून घेतली पाहिजे. म्हणजेच रो. ह. यो.वर एखाद्याने १२ महिने कामावर यावे असे नाही म्हणून ही शिफारस रो. ह. यो च्या भूमिकेशी सुसंगत नाही.

" श्रमिक उपलब्ध होतील म्हणून रो. ह. यो खाली कामे काढावीत असे नाही तर ज्या श्रमिकाला काम हवे असेल त्याला हे काम पुरविणे हे रो. ह. यो.चे तत्व आहे. "

—(रो. ह. यो. समिती आठवा अहवाल पान ५–६)

शेतीच्या कामात ज्याला गुंतवून घेणे शक्य नाही असा वरकड कामगाराचा एक वर्ग विशेषत: कोरडवाहु शेतीच्या भागात तयार झाला आहे या गोष्टीलाच आता शासन नाकारते. तसेच गांवाजवळ कामें घेतली तर अधिक लोकांना कामावर येणे सोयीचे होईल. पूर्वीचा व्यवहारी तसाच मानवीय दृष्टीकोनही शासन नाकारते.

## निलप्रत [ब्ल्यु प्रिंट] तयार करण्यासाठी धोरण–

शासनाच्या या बेदरकार वृत्तीवर ताशेरे झाडत समितीने स्पष्टच सांगितले कीं,

" सुधारित आदेशाप्रमाणे जास्त श्रमिकांना काम देण्याचे शासनाचे प्रयत्न स्वागतार्ह आहेत. तथापि नोंदणी केलेल्या सर्व श्रमिकांना दीर्घकाळ काम मिळेलच असे ठामपणे सांगता येणार नाही कारण आज बऱ्याच जिल्ह्यामध्ये पाझर तलाव, बंडिंगचे व रस्त्याची कामे संपली आहेत.

" ज्या ठिकाणी कामाची गरज आहे त्या ठिकाणी काम उपलब्ध होत नाही व ज्या ठिकाणी कामाची गरज नाही त्याचा समावेश निल प्रतमध्ये केलेला असतो— जादा मजुरांची संख्या ज्या ठिकाणी झाली आहे त्यांना २०० दिवस पुरेल एवढे काम मिळावे व गेल्या ३ वर्षाच्या हजेरीची सरासरी लक्षात घेऊन त्याच्या दुप्पट लोकांना काम देऊ शकेल अशा पद्धतीने निलप्रत तयार केली जाते. असे असतानाही अनेक ठिकाणी कामासाठी लोकांना मोर्चे वगैरे काढावे लागतात. "

समितीच्या या टीकेला उत्तर देतांना शासनाने सांगितले कीं,

" पाणलोट क्षेत्र ठरवायचे व त्याचा सर्व्हे करावयाचा आणि त्या पाणलोट क्षेत्रात पाणी साठविणे, त्या पाण्याचा योग्य उपयोग करण्यासाठी व जमिनीची धूप थांबविण्यासाठी—कार्यक्रम घ्यावयाचा – निर्णय घेतला आहे — जवळपास १२५ लाख हेक्टर जमीन, जमीन सपाटीकरण व तत्सम कामाकरिता उपलब्ध होणार असून येत्या कांही वर्षाकरिता या योजनेखाली श्रमिकांना कामे देता येतील. "

यावर समितीने म्हटले की, शासनाने म्हटल्याप्रमाणे कामे घेतली तरीं सर्वच ठिकाणी लोकांना कामे मिळतील असे सांगता येणार नाही म्हणून समितीने सुचविले कीं—

" नील प्रतिमधील सर्व कामे त्याच वर्षी हाती घेण्याबाबत लक्ष ठेवण्याची गरज आहे. निल प्रतितील कामावरोचें वर्ष संपण्यापूर्वी कामे संपलेली आहेत असे चित्र दिसू नये. १०–१२ खेड्याचे ५ किलोमिटरचे पॉकेट तयार करुन त्या ठिकाणी बाराही महिने काम मिळेल इतके काम मंजुर करुन ठेवणे आवश्यक आहे. त्या पॉकेट-मध्ये सातत्याने मजुराची फार मोठ्या प्रमाणात उपस्थिती तेथील गेली ५–६ वर्षाची मजूरांची सरासरी संख्या लक्षात घेऊन बिल प्रतिमध्ये मोठ्या प्रमाणात कामाचा समावेश करण्याची आवश्यकता आहे निल प्रतमध्ये समाविष्ट असणाऱ्या कामाबाबत तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी आहे याची खात्री करुन घ्यावी. जेणेकरुन काम सुरु करण्यास अडचण येऊ नये. ज्याठिकाणी नालाबंडिंग, पाझर तलावाची कामे संपलेली आहेत त्या ठिकाणी शासनांच्या नवीन आदेशाप्रमाणे जमीन सपाटीकरण, झाडे लावणे, हॉर्टिकल्चरचा कामे, अंबर चरख्याची कामे, मागासवर्गीय शेतकरी व अल्पभूधारक शेतकरी यांच्या शेतीमध्ये विहीरी खोदण्याचे काम इत्यादींचा विचार करुन अशी कामे श्रमिकांना दीर्घकाळपर्यंत देता येईल या दृष्टीने निलप्रत तयार करुन अंमलबजावणी करावी अशी समितीची शासनास शिफारस आहे. "

—रो. ह. यो. समिती आठवा अहवाल पा १

रो ह. यो. समितीने केलेल्या या सूचना आज ही महत्वाच्या आहेत व कामाच्या बाबतीत प्रयत्नाची ही दिशा पाहिजे.

## तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता–

कामे पुरविण्याच्या बाबतीत एक मुख्य अडथळा पुरेसा तांत्रिक कर्मचाऱ्यांचा अभाव आहे. ज्या पातळीवर मजुरांकडून काम दाखविले जाते, मोजमाप घेतले जाते, केलेल्या कामावर देखरेख केली जाते त्या पातळीवर स्टाफमध्ये वाढ नाही आणि कामाचा विस्तार तर प्रचंड झाला आहे. साधे मस्टर कारकुन पण त्यांचीही सेवा टेंपररी आहे म्हणून रो. ह. यो. समितीने आपल्या नवव्या अहवालात या संबंधात पुन: स्पष्ट सूचना केली आहे की —

" काम सुरु असताना कामाची तपासणी आवश्यक आहे. समितीला असे आढळले की, पाझर तलाव, रस्ते, नाला बंडिंगची कामे झाल्यावर तांत्रिक दृष्टया तपासणी होत नाही परिणामी पाझर तलाव फुटणे, पावसाळ्यात रस्त्यावरची खडी वाहून जाणे ई. प्रकार घडतात. अधिकाऱ्यांना याबाबत विचारले असता तांत्रिक कर्मचारी त्या प्रमाणामध्ये नाहीत.

" विभागीय प्रमुखांनी साक्षीच्या वेळी सांगितले की, उप अभियंत्याचा जागा वाढविल्या तर कामावर देखरेख ठेवणे, काम तपासणे आदि गोष्टी होऊ शकतील वास्तविक हा नव्याने उद्‌भवलेला प्रश्न आहे असे म्हणता येणार नाही. कारण वर्षानुवर्षे हीच तक्रार ऐकावयास मिळते. दर बैठकीमध्ये यावर चर्चा होते परन्तु त्या दृष्टीने कांहीच पाऊल उचलले जात नाही

रो ह. यो. समिती—नववा अहवाल-१९८३-८४ पा. ८

समितीने पुन्हा एकवार प्रत्येक खात्यात किती तांत्रिक कर्मचारी आवश्यक आहेत याचा आढावा घेऊन तेवढ्या लोकांची त्वरित नेमणूक करण्याची शिफारस केली परन्तु त्याचा कांही उपयोग झाला नाही. कारण शासनाचे सर्वसामान्य धोरण याच्या अगदी विरुद्ध आहे. त्यांना नवे कर्मचारी भरती न करण्याचे कायमचे आदेश आहेत आता तर १५ टक्के खर्च कमी करण्याचे आदेश निघाले आहेत. जो पर्यंत रोजगार हमी योजना ही कायम योजना समजून त्यास आवश्यक तेवढा स्वतंत्र कर्मचारी वर्ग दिला जात नाही तोपर्यंत हे रडगाणे राहणार आहे, पुरेशी कामे निघणार नाहीत, वेळेवर मोजमाप व पगार होणार नाही, कामावर देखरेख राहणार नाही. भ्रष्टाचाराला लगाम घातला जाणार नाही. शासनाने रो. ह. यो. कडे कोणत्या दृष्टीने पाहावे याचा हा प्रश्न आहे.

## जिल्हा व तालुकास्तरावरील समित्या–

रोजगार हमी कायदा, १९७७ च्या कलम ४ प्रमाणे राज्यस्तरावर व कलम ५ प्रमाणे जिल्हा व पंचायत समिती स्तरावर रो. ह. यो. समित्या कायम करण्याचे स्पष्ट आदेश शासनाला आहेत. या समित्यांना रो. ह. यो. तहत केल्या जाणाऱ्या

कामावर देखरेख करण्याचे, त्याचा आढावा घेण्याचे तसेच त्यासंबंधी शासनाला वेळोवेळी सूचना देण्याचे अधिकार आहेत. तसेच या सूचनावर काय कारवाई केली हे समितीला कळविण्याची जबाबदारीही या कायद्याने शासनावर टाकली आहे. या समित्यावर जिल्हा व पंचायत समिती पातळीवर-दोन मागास जातीचे प्रतिनिधी व दोन शेतमजूर किंवा त्यांच्या युनियनचे प्रतिनिधी असलेच पाहिजे असाही कायद्याचा दंडक आहे. या वरुन एकंदर रो. ह. यो.त जनतेचा सातत्याने सहभाग असायला पाहिजे या गोष्टीला विधीमंडळाने हा कायदा सम्मत करतांना किती महत्व दिले होते हे कळते. परन्तु प्रत्यक्षात काय घडले ? राज्यस्तरीय समितीचा दहावा अहवाल (१९८५-८५ ६ नोव्हेंबर १९८४) म्हणतो की,

" समित्या गठित करण्याबाबत शासनाने १९८१ मध्ये आदेश काढूनही नाशिक जिल्हा व्यतिरिक्त इतर जिल्हयांत समित्या गठित झालेल्या नाहीत. या संबंधी खुलासा व्हावा म्हणून समितीने नियोजन विभागाच्या सचिवाची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी सांगितले कीं पंचायत समिती स्तरावर व जिल्हा स्तरावरील समित्यामध्ये अशा सक्रीय प्रतिनिधीची नेमणुक त्यामध्य मागासवर्गीय प्रतिनिधीची नेमणूक सामाजिक कार्यकर्ते व रो. ह. यो. कामावर काम करणारे प्रतिनिधी यांची नेमणूक राज्यस्तरावर केली जाते अशाप्रकारे सर्वत्र म्हणजे ४०० पंचायत समित्यावर व २९ जिल्हयामध्ये प्रत्येकी सहा व चार माणसांची नेमणूक राज्यस्तरावर करण्याची जी प्रथा आहे. त्यामुळे अडचण येते— पालकमंत्री व इतर मंत्री यांच्या समन्वयाने नेमणूक केल्या जातात. तसेच जिल्हयाकडून या बाबतीत प्रस्ताव शासनाकडे पाठविला जातो व नियोजन विभागाकडून मुख्यमंत्र्यापर्यन्त पाठविण्यात येतो. मुख्यमंत्र्यानी संमती दिल्यानंतर त्यासंबंधीचा आदेश काढण्यांत येतो. नाशीक जिल्हया व्यतिरिक्त अमरावती जिल्हयाचे प्रस्ताव आलेले असुन मे १९८४ मध्ये राज्यमंत्री रो. ह. यो. यांच्याकडे सादर केलेले आहे. ठाणे, नागपुर, सातारा जिल्हयाबाबत प्रस्ताव आले असून सादर करण्यात आले आहेत. धुळे जिल्हयाबाबत नुकतेच आदेश काढण्यात आलेले आहेत. "

—रो.ह.यो. समिती दहावा अहवाल पा. १

ही आहे आस्था लोकांचा सहभाग घेण्याबाबत ! कायदा सम्मत होऊन नऊ वर्षे झाली तरी २९ पैकी २८ जिल्हयात रो ह.यो.समिती नाही. पंचायत समित्यांचाच तर विचारच नाही ! याला जबाबदार संबंधित मंत्री आहेत, सरकार आहे. त्यांची निष्क्रीयता गटबाजीचे व पक्षबाजीचें राजकारण आहे.

रो. ह. यो. च्या अंमलबजावणीसंबंधी अजून पुष्कळ सांगण्यासारखे आहे. समितीने आपल्या अहवालात ते वेळोवेळी सांगितले आहे. रो ह. यो. साठी स्वतंत्र तहसीलदार नेमा, स्वतंत्र ऑडीट नेमा, भ्रष्ट अधिकाऱ्यांना शासन करण्याचे अधिकार

( मुखपृष्ठ नं. २ वर पहावे )